अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

## चोरीची पाहणी करायला गेलेल्या पोलिसाला मारहाण

**मोहोळ** : चोरी झालेल्या ठिकाणी पोलिस पहाणी करित असताना पोलिसांना शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून गुरुवारी सकाळी आठ वाजणेच्या सुमारास नरखेड येथे हा प्रकार घडला.

नरखेड येथील एस टी स्टँड जवळ असणाऱ्या मोटार रिवायडींग व पीव्हीसी पाईप दुकनात चोरी झाल्याचा फोन आल्याने पोलिस नाईक सत्यवान जाधव व पोलिस कॉन्स्टेबल पोफळे हे दोघे चोरी झालेल्या सुधीर शहाजी भोसले यांच्या दुकानाची पहाणी करण्यासाठी गेले. त्यावेळी नरखेड येथील अविनाश लिंबाजी कोल्हाळ व कुबेर माणिक मोरे यांनी शिवीगाळ करून कॉलर पकडून कानावर जोरात मारले. त्यावेळी त्यास नरखेड येथील पोलिस चौकीत घेवून जात असताना अविनाश कोल्हाळ यांचा भाऊ सुरज लिंबाजी कोल्हाळ व वडील लिबाजी कोल्हाळ हे पोलिसांच्या अंगावर येवून माझ्या भावाला हात का लावला? सोड नाही तर काय खैर नाही, असे म्हणत शिवीगाळ करित पोलिसांच्या हातावर काठी मारली. अविनाश कोल्हाळ याला सोडवून कुबेर माणिक मोरे हे पळून गेले.

पोलिस नाईक सत्यवान जाधव व बिट अमलदार पोफळे यांना मारहाण शिवीगाळ करित धमकी देणारे अविनाश लिंबाजी कोल्हाळ कुबेर माणिक मोरे सुरज लिबाजी कोल्हाळ वडील लिंबाजी यशवंत कोल्हाळ या चौघावर शासकीय कामात अडथळा केला म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास मोहोळ पोलिस करित आहेत.

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि.१७ फेब्रुवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १४० वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# माजी क्रीडामंत्र्यांचा खेळ उघड

## खंदारेंविरोधात पुण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल

सुराज्य/पुणे

**राज्यात पहिल्यांदाच सत्तेत आलेल्या शिवसेना-भाजप युती सरकारमध्ये क्रीडा खात्याचे राज्यमंत्रिपद भोगलेले माजी राज्यमंत्री उत्तमप्रकाश खंदारे यांचा खेळ उघडकीस आला आहे. त्यांच्याविरोधात पुण्यातील बिबवेवाडी पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणात त्यांच्या दोन सहकाऱ्यांसह एका महिलेचाही आरोपी म्हणून सहभाग आहे. अद्यापपर्यंत या प्रकरणात कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.**



यात्रकरणी एका ३७ वर्षाच्या महिलेने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी उत्तम प्रकाश खंदारे (वय ६५, रा. सोलापूर), त्याचे साथीदार महादेव भोसले, बंडू दशरथ गवळी (रा. सोलापूर) यांच्यासह एका महिलेवर गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार बी रेस्ट हाऊस व बिबवेवाडीत २०१२ पासून ते आत्तापर्यंतच्या काळात घडला आहे.

अकरा वर्षानंतर महिलेने याप्रकरणी पोलीस ठाण्यात धाव घेतली आहे. खंदारे यांनी मुलाचा सांभाळ करतो, असे सांगून लग्नाचे आमिष दाखवून महिलेला चाकूचा धाक दाखवून बलात्कार केला. मुलाच्या संगोपनासाठी त्यांनी दिलेले चेक वटले नाहीत. तसेच महिलेला जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. खंदारे हे तत्कालीन शिवसेना-भाजप युतीमध्ये सामाजिक न्याय तथा क्रीडा मंत्री होते. तसेच उत्तर सोलापूर विधानसभा मतदारसंघातून ते तीनवेळा आमदार म्हणून निवडून गेले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्तम खंदारे याने फिर्यादी यांना लग्नाचे आमिष दाखविले व फिर्यादीच्या मुलाचा सांभाळ करतो, असे भासवले. बी रेस्ट हाऊस येथे फिर्यादीला बोलावले. त्यांना चाकूचा धाक दाखवून बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा फिर्यादी यांनी नकार दिला, तरीही त्यांनी पट्ट्याने मारहाण करत त्यांच्यावर बलात्कार केला.

### ६१ लाखांचे चेक झाले बाऊन्स

यापूर्वी झालेल्या समझोत्यानुसार यात्रकरणातून पिडीतेला झालेल्या मुलाच्या संगोपनासाठी एकूण ६१ लाखांचे काही चेक आरोपीने दिले होते. पिडितेने यापैकी काही चेक बँकेत भरले. मात्र त्यातील एकही चेक वटला नाही. याबाबत पिडितेने आरोपीकडे विचारणा केली असता सुरुवातीला आरोपीने दुर्लक्ष केले. याबाबत वारंवार विचारणा केली असता त्यांच्या भांडणे झाल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून मिळाली.

### पिडितेला झाला मुलगा

दरम्यान फिर्यादीने एका मुलाला जन्म दिला आहे. या मुलाच्या संगोपनासाठी खंदारे यांनी आर्थिक तरतूद म्हणून चेक दिले. परंतु ते चेक वटले नाहीत. तेव्हा फिर्यादी यांनी ही बाब त्यांना सांगितल्यावर त्यांनी व इतरांनी फिर्यादी यांना जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे त्यांनी आता जिवाच्या भीतीने पोलिसांकडे धाव घेऊन फिर्याद दिली. पोलीस उपनिरीक्षक शिंदे तपास करीत आहेत.

### यापूर्वी झाला होता समझोता

यापूर्वीही संबंधित पिडीत महिला आणि आरोपी यांच्यात भांडणे झाली होती. त्यावेळी त्यांच्यात समझोता झाला होता. तेव्हा पिडीत आणि तिच्या मुलाला सांभाळण्यास तयार असल्याचे आरोपीने लेखी दिले होते. मात्र त्यानंतर आरोपीने त्या लेखी समझोत्याकडे दुर्लक्ष केले. ही बाब पिडितेने निदर्शनास आणल्यानंतर तिला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली, अशी प्राथमिक माहिती समोर आल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

फिर्यादी महिला ह्या उत्तमप्रकाश खंदारे यांच्याकडे काम करत होत्या. त्यातून त्यांचा परिचय झाला होता. त्यांच्यावर लैंगिक अत्याचार झाल्यानंतर त्यांनी याबाबत बिबेवाडी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार अर्ज दाखल केला होता. अर्जाच्या चौकशीअंती खंदारे आणि त्यांच्या साथीदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

**- संगिता जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिबवेवाडी**

### ठेकेदारानेच अडकवले अधिकाऱ्याला

## १३ हजारांची लाच घेताना पालिकेतील सहाय्यक अभियंत्यास पकडले रंगेहाथ

सुराज्य/सोलापूर

ठेकेदाराकडून १३ हजार रुपयांची लाच घेताना महापालिकेतील गवसू तांत्रिक विभागाकडील सहाय्यक अभियंता सुनील नेमिनाथ लामकाने (वय ५७, रा. दमाणी नगर) यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांच्याच कार्यालयात रंगेहात पकडले. त्याला ठेकेदाराने अडकवल्याची चर्चा संपूर्ण पालिका वर्तुळात सुरू होती.

तक्रारदार हे ठेकेदार आहे.त्याच्याकडे सुनील लामकाने याने सोलापूर हद्दीत शेळगी ते स्मशानभूमी येथे केलेल्या डांबरी रस्ता रस्त्याचे मोजमाप पुस्तकावर सही करून दिल्याचा मोबदला म्हणून ६ हजार रुपये तसेच बारामती बँक ते आकाशगंगा मंदिर येथील डांबरी रस्त्याचे मोजमाप पुस्तकावर सही करण्याकरिता ७ हजार रुपये असे एकूण १३ हजारांची मागणी केली होती. त्यानंतर संबंधित ठेकेदारने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधाला. लाचेची रक्कम महापालिकेच्या गवसु तांत्रिक विभागातील कक्षामध्ये लामकाने हा स्वीकारत असताना



त्याला रंगेहाथ पकडण्यात आले. त्याच्याविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पर्यवेक्षण अधिकारी गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक, पोलीस अंमलदार गिरीश कुमार सोनवणे, पोलीस नाईक अतुल घाडगे, पोलीस कॉन्स्टेबल स्वप्निल सन्नाके, सलीम मुल्ला यांच्या पथकाने केली.

या घटनेनंतर त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने लामकाने याच्या दमाणीनगर येथील प्रियदर्शनी अपार्टमेंटमधील राहत्या निवासस्थानी भेट देऊन घराची झाडाझडती करून चौकशी सुरू केली आहे. रात्री उशिरापर्यंत त्याची चौकशी सुरू होती. लामकाने यांना शुक्रवारी न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

## डॉ.द.ता.भोसले यांना पाडगावकर पुरस्कार

**पंढरपूर** : महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालय मुंबई तर्फे देण्यात येणारा मराठी भाषेसाठी केलेल्या कार्याबद्दल दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल पुरस्कार जाहीर झाला असून पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम रुपये दोन लाख, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे आहे.



प्रा.डॉ.द.ता.भोसले यांनी आतापर्यंत मराठी भाषेसाठी ग्रामीण बोलींचा संग्रह (दोन), दुर्मीळ म्हणींचा संग्रह (तीन) या विशेष योगदानाबद्दल पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रा.डॉ.द.ता.भोसले यांनी आतापर्यंत मराठी भाषेत चार कादंबऱ्या, बारा कथासंग्रह, आठ ललित ग्रंथ, दहा लोकसाहित्य, लोकसंस्कृतीवरील ग्रंथ, आठ समीक्षा ग्रंथ, दोन चरित्र ग्रंथ, लेखकांच्या पुस्तकांना दिलेल्या प्रस्तावनेची तीन पुस्तके व चौदा संपादने इत्यादी पुस्तके प्रकाशित केली आहेत. डॉ द.ता.भोसले यांना सोळा जीवन गौरव पुरस्काराने आत्तापर्यंत सन्मानित करण्यात आले आहे, त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाचे चार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे ,भारती विद्यापीठ पुणे, बाळासाहेब विखे प्रतिष्ठान, आचार्य अत्रे प्रतिष्ठान, दमाणी साहित्य पुरस्कार इत्यादी मान्यवर संस्थांचे पुरस्कार मिळाले आहेत. एकूण आतापर्यंत दोनशे पेक्षा जास्त पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. त्यांनी मराठी भाषा अभ्यासक्रम मंडळ, शिवाजी विद्यापीठ पुणे, बालभारती पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम मंडळ पुणे या संस्थावर काम केले आहे.



## ऑपरेशन परिवर्तनच्या पाहणीसाठी केंद्र सरकारची टीम सोलापुरात

**सोलापूर** : तत्कालीन पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या ऑपरेशन परिवर्तन उपक्रमाचा डंका राज्यातच नव्हे तर देशाच्या संसदेपर्यंत पोहोचला.पंतप्रधान पुरस्काराकरिता या उपक्रमाचे नामांकन झाले असून या उपक्रमाची पाहणी करण्याकरिता केंद्र सरकारच्या दोन अधिकाऱ्यांची टीम गुरुवारी सोलापुरात दाखल झाली.

सकाळी त्यांनी मुळेगाव तांडा व इतर तांड्यात प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली तसेच लाभार्थ्यांशी संवाद साधला.या टीममध्ये महिला व बालकल्याण विभागाच्या संचालक एसडी तिवारी तसेच लोकप्रशासन विभागाचे उपसचिव रजनीश मोहन सिंग या दोन अधिकाऱ्यांच्या या पाहणी पथकात समावेश होता. अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप, तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांच्यासह तालुका पोलीस ठाण्याचे पथक यांच्यासमवेत टीमने मुळेगाव तांडा, तिल्हे हाल तांडा वळसंग येथील कुंभारी तांडा आदी ठिकाणी पाहणी करून प्रत्यक्षात ऑपरेशन परिवर्तनमुळे लाभार्थ्यांमध्ये कोणत्या अर्थाने परिवर्तन झालेले आहे.

रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे का? हातभट्टी गाळण्याचे व्यवसायातून किती जणांची मुक्तता झाली? किती जणांनी नवीन व्यवसायाचा व जगण्याचा मार्ग शोधला. या दृष्टीने या टीमने पाहणी केली. गुरुवार आणि शुक्रवार अशी दोन दिवस ही टीम या ठिकाणी पाहणी करणार आहे.



## कर्नाटकातून येणाऱ्या पिकपसह २६ लाखांचा गुटखा जप्त


### तिघांविरुद्ध गुन्हा; मंगळवेढा पोलिसांची कामगिरी

**मंगळवेढा** : मंगळवेढा-कर्नाटक राज्यातून येणाऱ्या एका पिकअप वाहनावर छापा टाकून मंगळवेढ्याच्या पोलिसांनी १७ लाख ३२ हजाराचा गुटखा आणि ९ लाखांचे वाहन असा एकूण २६ लाख ३२ हजाराचा माल जप्त केला. या प्रकरणात पोलिसांनी तिघांविरुद्ध अन्न सुरक्षा व मानदे अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल केला.

ही कारवाई बुधवारी सायंकाळी महमदाबाद( ता.मंगळवेढा) येथे करण्यात आली. चडचण (कर्नाटक) येथून अवैधरीत्या महाराष्ट्रात गुटखा वाहतूक केली जात असल्याची माहिती पोलीस निरीक्षक रणजीत माने यांना मिळाली. त्याप्रमाणे बुधवारी सायंकाळच्या सुमारास निरीक्षक रणजीत माने, फौजदार धापटे, हवालदार महेश कोळी, मनसिद्ध कोळी अजित मिसाळ आणि प्रशांत चव्हाण यांनी काल सायंकाळी महमदाबाद येथील कच्च्या रोडवर सापळा रचला होता. आणि एमएच४५-एएफ-३७७१ हा पिकअप अडवून तपासणी केली असता वाहनाचा चालक बाजीराव विष्णू बाबर (रा. आलेगाव ता.सांगोला) यांनी पिकअप मध्ये गुटखा असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे पोलिसांनी पिकअप जप्त करून पाहणी केली असता त्यात गुटखा, तंबाखू आणि पान मसाल्याचे पाऊच आढळले.पोलिसांनी वाहनाचा चालक बाजीराव विष्णू बाबर आणि गुटखा खरेदी करणारा दिलीप रामचंद्र मस्के (रा. सांगोला) आणि गुटख्याच्या व्यापारी श्रीशैल ऊर्फ अप्पू कलमणी (रा.चडचण जि.विजयपूर) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्यानंतर जप्त केलेल्या माल आणि आरोपी पुढील कारवाईसाठी सोलापुरातील औषध प्रशासनाच्या ताब्यात दिले.या गुन्ह्याचा पुढील तपास हवालदार महेश कोळी हे करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सब मोह-माया हैं!!!

कल्याण
330-68-189

मेन बाजार
560-12-345

## जुळे सोलापूर रॅम्पवर महापालिकेचे वाहन पेटले

सुराज्य/सोलापूर

जुळे सोलापूर येथील महापालिकेच्या एचएसआर रॅम्प येथे एका आरसी वाहनास अचानकपणे आग लागली. यामध्ये या वाहनाचे टायर व केबिन जळून खाक झाले. गुरुवारी सायंकाळी पाच वाजता ही घटना घडली. अग्निशामक दलाच्या दोन गाड्यांनी पाणी मारून ही आग आटोक्यात आणली. यात कोणतीही जीवित हानी झाली नाही.

सोलापूर महापालिकेच्या घंटागाड्या रिकाम्या करण्यासाठी जुळे सोलापूर येथे एचएसआर येथे रॅम्प आहे. रॅम्प येथे दुपारच्या पाळीत घंटागाड्या रिकामी करण्यासाठी आलेले आरसी वाहन क्रमांक एमएच १३ सीजे ९०३२ चालक कृष्णा इरकल आणि ऑपरेटर विवेक माने हे घेऊन आले. सायंकाळी हे आरसी रॅम्पवर लावल्यानंतर वजन काटा पाण्यासाठी वाहन चालक हे आतल्या बाजूस गेले. त्यादरम्यान बॅटरी शॉर्टसर्किट झाल्याने अचानकपणे आरसी वाहनाने पेट घेतला. वाहनाच्या केबिनमध्ये ही आग पसरली. या आगीत टायरसह केबिन जळून खाक झाले. दरम्यान येथील कर्मचाऱ्यांनी तत्काळ अग्निशामक दलाला संपर्क साधला. काही वेळातच महावीर चौकातील अग्निशामक दलाच्या दोन गाड्यांनी ही आग आटोक्यात आणली. यात सुमारे १० लाखांचे नुकसान झाल्याची शक्यता आहे. यापूर्वी रूपाभवानी चौक येथील रॅम्प या ठिकाणीही अशा प्रकारे आरसी वाहन पेटले होते. त्यानंतर आता ही दुसरी घटना घडली आहे. या घटनेची माहिती मिळताच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी ही घटनास्थळी भेट दिली.



### नवे चार आरसी वाहन येणार : बिराजदार

महापालिकेच्या घनकचरा विभागाकडे कचरा संकलनासाठी आणखी वाहनाची गरज लक्षात घेऊन नव्या चार आरसी वाहनांची मागणी करण्यात आली आहे. काही दिवसातच हे आरसी वाहन महापालिकेच्या ताफ्यात दाखल होईल, अशी माहिती मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांनी दिली.

# करवीरची केमिस्ट्री...

भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे रविवारी कोल्हापूरच्या दौऱ्यावर येत आहेत. शहा हे कोल्हापूरचे जावई. सासुरवाडीला येत असताना त्यांची अन्य कामे असतील पण त्यामागे राजनीती असणार, यात शंकाच नाही. कोल्हापूरचे राजकारण फिरवण्याचा शहा यांचा इरादा असावा तसेच सहकार क्षेत्रावरही त्यांची नजर आहे. त्यामुळे केवळ कोल्हापूरच नव्हेतर अख्ख्या प.महाराष्ट्रात राजकीय वादळ उठलेले असणार. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये लोकसभा निवडणुकीत आजवर काँग्रेस-राष्ट्रवादीचे वर्चस्व राहिले. नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व भाजपला मिळाल्यानंतर कल बदलू लागला. राजू शेट्टी हे दुसऱ्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी भाजप सोबत असल्याने त्यांनाही मोदी लाटेचा लाभ झाला. गेल्या लोकसभा निवडणुकीवेळी भाजप-शिवसेना युती होती. शिवसेनेचे निवडून आलेले संजय मंडलीक (कोल्हापूर) व धैर्यशील माने (हातकणंगले) हे घराण्यात खासदारकीचा वारसा असलेले दोघेही प्रथमच संसदेत पोहोचले. कोल्हापूर जिल्ह्यातील लोकसभा मतदारसंघाचा कल असा बदलत असताना भाजप कार्यकर्त्यांना वेगळीच सल लसत राहिली. भाजपच्या मतावर निवडून यायचे आणि नंतर वेगळी भूमिका घ्यायची, यामुळे मधल्या काळात कार्यकर्ते दुखावले गेले. त्यातूनच भाजप, मोदी लाटेचा फायदा आणि कार्यकर्त्यांचे कष्ट याचा फायदा घेऊन अन्य कोणी निवडून येण्यापेक्षा कमळ चिन्हावर खासदार निवडून आले पाहिजेत ही भावना प्रबळ होत आहे. भाजपच्या अंतर्गत गोटातही असेच धोरणात्मक डावपेच असले असली तरी त्याची उघड वाच्यता केली जात नाही, हे विशेष. यासाठी भाजपकडून दोन पर्याय चोखळले जात आहेत. जिल्ह्यातील दोन्ही खासदारांना कमळ चिन्हावर उभे करण्याच्या हालचाली आहेत. केवळ शिंदे गटाकडून निवडून येणे हेही इतके सोपे नसल्याने कमळ तारणहार ठरू शकेल, अशा खासदार समर्थकांच्या भावना आहेत. भाजपने गेल्या दहा-बारा वर्षांमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील लोकसभा मतदारसंघात चांगलाच प्रभाव दाखवलेला आहे. सांगली, सोलापूर व माढा या मतदारसंघांमध्ये कमळ चिन्हावर भाजपचे खासदार निवडून आले आहेत. सातारा (मध्यावधी व पोटनिवडणूक) तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील दोन्ही जागा भाजपची दुखरी नस आहे. भाजपने आगामी लोकसभा निवडणुकीत राज्यात ४५ जागांवर विजय मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामध्ये सातारा आणि कोल्हापुरातील दोन्ही जागांचाही समावेश असल्याचे सांगितले जाते.



राज्यसभा निवडणुकीत धनंजय महाडिक विजयी झाले असले तरी कोल्हापूर व हातकणंगले मध्ये कमळ फुलवण्याचे ध्येय घेऊन कोल्हापूरचे जावई असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या पत्नी सोनल शहा यांचे शिक्षण झालेल्या न्यू एज्युकेशन सोसायटी शताब्दी कार्यक्रमास उपस्थिती लावल्यानंतर शहा हे मुख्य उद्दिष्टाकडे वळतील,असे सांगण्यात येते. भाजपच्या नूतन कार्यालयातील गणेश मंदिराची पायाभरणी केल्यानंतर कार्यकर्त्यांशी संवाद साधताना जिल्ह्यातील दोन्ही लोकसभा जिंकणे हे उद्दिष्ट ते बोलून दाखवतील. राज्याचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी भाजपच्या लोकसभा निवडणूक तयारीचा फायदा निश्चितपणे होणार असल्याचे म्हटले आहे. याचा एक अर्थ लोकसभा निवडणूक भाजप कमळ चिन्हावर लढेल, असाही लावला जात आहे. अमित शहा - चंद्रकांत पाटील यांची राजकीय केमिस्ट्री अधिक जुळणारी असल्याने चंद्रकांतदादांनी दौऱ्याची भक्कम आखणी केली आहे. कोल्हापूर जिल्हा दौरा करणारे शहा चौथे केंद्रीय मंत्री आहेत. भाजपचे रथी महारथी गावोगावी फिरत असताना विरोधकांच्या छावणीत शांतता नांदत आहे. शहा हे केंद्रातील पहिले सहकार मंत्री आहेत. पश्चिम महाराष्ट्र हा साखर कारखानदारीचा पट्टा म्हणून ओळखला जातो. गेल्या काही वर्षांमध्ये केंद्र शासनाने साखर निर्यात, इथेनॉल प्रकल्प, थकीत प्राप्तिकर आकारणी रद्द या तीन निर्णयाच्या माध्यमातून साखर कारखानदारीला मोठा दिलासा दिला आहे. याची उतराई म्हणून भाजप आणि पाठिंबा देणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या साखर कारखान्याच्या वतीने नरेंद्र मोदी, अमित शहा यांच्या या निर्णयाचे स्वागत करणाऱ्या मोठमोठ्या जाहिराती प्रसिद्ध करून शहा यांच्या दौऱ्याची वातावरण निर्मिती करण्यात आली आहे. सहकारातील काही महत्त्वाचे निर्णयही अपेक्षित असल्याने राजकीय तसेच सहकार क्षेत्राचेही शहा यांच्या दौऱ्याकडे लक्ष लागले आहे. प. महाराष्ट्रात सहकाराचे जाळे मोठ्या प्रमाणात आहेत. या विभागाचे राजकारण केवळ सहकार क्षेत्रावर अवलंबून आहे.त्यामुळे सहकार क्षेत्र ताब्यात आल्याखेरीज शुगर बेल्टमध्ये भाजपचे बस्तान बसणार नाही, हा भाजपचा निष्कर्ष खोटा आहे, असे म्हणता येणार नाही.

## राजकीय

# जी-२० समूह : प्रमुख उपलब्धी

भारताने अध्यक्षपदाच्या कार्यकाळात ऊर्जा संक्रमणांमधील त्याची कामगिरी आणि सौभाग्य, उज्ज्वला आणि उजाला योजनांसारख्या भारत सरकारच्या विविध उपक्रमांद्वारे आपल्या लोकसंख्येला स्वच्छ ऊर्जेचा सार्वत्रिक ऊर्जा प्रवेश उपलब्ध करून देण्यात मिळवलेले यश प्रदर्शित केले. मागणीची बाजू व्यवस्थापित करण्यासाठी आणि पर्यावरणासाठी जीवनशैली मोहिमेद्वारे जबाबदार वापराला चालना देण्याच्या भारताच्या आवाहनाला सर्व सहभागी देशांकडून पूर्ण पाठिंबा मिळाला.

भारताच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावित केलेल्या सहा प्राधान्य क्षेत्रांना सदस्य देशांकडून अभूतपूर्व पाठिंबाही मिळाला, ज्यात (i) तंत्रज्ञानातील तफावत दूर करून ऊर्जा संक्रमण (ii) ऊर्जा संक्रमणासाठी वाजवी दरात वित्तपुरवठा (iii) ऊर्जा सुरक्षा आणि वैविध्यपूर्ण पुरवठा साखळी (iv) ) ऊर्जा कार्यक्षमता, औद्योगिक नियंत्रित कार्बन संक्रमण आणि जबाबदार वापर, (v) भविष्यासाठी इंधन : हरित हायड्रोजन आणि जैव-इंधन आणि (vi) स्वच्छ ऊर्जेसाठी सार्वत्रिक प्रवेश आणि न्याय्य, किफायतशीर, आणि सर्वसमावेशी ऊर्जा संक्रमण मार्ग यांचा समावेश होता.

कार्यक्षमता वाढवणे आणि इलेक्ट्रोलायझर्स, इंधन सेल, कार्बन मिळवणे, वापर आणि साठवण (CCUS), बॅटरी स्टोरेजसाठी प्रगत केमिस्ट्री सेल आणि स्मॉल मॉड्युलेटर न्यूक्लियर रिॲक्टर्सची किंमत कमी करणे ही आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी प्रमुख क्षेत्र म्हणून निवडली गेली.

जागतिक ऊर्जा संक्रमण साकार करण्यासाठी ऊर्जा सुरक्षेच्या अविभाज्य महत्त्वावर एकमत हे या चर्चेचे फलित होय. प्रत्येक देशाला ऊर्जा संसाधन संपत्तीवर आधारित स्वतःचा ऊर्जा संक्रमण मार्ग असेल हे यातून निष्पन्न झाले.

निव्वळ-शून्य कार्बन उत्सर्जन भविष्यापर्यंत पोहोचण्यासाठी, २०२१ मधील २९% वरून २०५० मध्ये जगातील ९०% वीज, अक्षय ऊर्जा स्रोतांमधून मिळवणे आवश्यक आहे. जागतिक सौर आणि पवन ऊर्जा क्षमता वेगाने वाढणे आवश्यक आहे. वर्ष २०२० ते २०५० दरम्यान केवळ सौर ऊर्जा क्षमता १७ पट वाढण्याचा अंदाज आहे. २०५० पर्यंत, ऊर्जा क्षेत्रातील विद्युतघटाचा वार्षिक वापर जागतिक स्तरावर ३०० गिगावॅट पेक्षा जास्त म्हणजेच २०२१ मधील विद्युत घटाच्या आवश्यकतेपेक्षा ५१ पटीने वाढला पाहिजे. त्याचप्रमाणे, हरित हायड्रोजनसाठी अभूतपूर्व वाढीचा अंदाज आहे, जेथे २०३० पर्यंत इलेक्ट्रोलायझर क्षमतेच्या १२९ टक्के वार्षिक चक्रवाढ दर (~850 गिगावॅट) आवश्यक आहे.

**बंगळुरूमध्ये पहिली ऊर्जा संक्रमणविषयक कार्यगटाची बैठक यशस्वीरीत्या पार पडली. १८ सदस्य देशांचे प्रतिनिधित्व करणारे ११०हून अधिक प्रतिनिधी, ९ विशेष आमंत्रित अतिथी देश आणि १५ आंतरराष्ट्रीय संघटना या पहिल्या बैठकीत सहभागी झाल्या होत्या.**

जग नवीन नवीकरणीय ऊर्जा (अक्षय ऊर्जा) निर्मिती क्षमता वाढवत असताना पुरवठा साखळ्यांमध्ये विविधता आणण्याची तातडीची गरज हे निदर्शनास आलेले एक महत्त्वाचे आव्हान होते. एका विश्लेषणातून असे दिसून आले आहे की २०२२ मध्ये, प्रमुख तंत्रज्ञानाची ८०% पेक्षा जास्त उत्पादन क्षमता; सौर पीव्ही मॉड्यूल (~480 GW), पवन (~120 GW), लिथियम-आयन विद्युतघट (1000 GWh), आणि ५०% पेक्षा जास्त इलेक्ट्रोलायझर्स (8GW/yr) फक्त तीन देशांमध्ये प्रकर्षाने आहेत. गेल्या दशकात, उदाहरणार्थ, सौर पीव्ही सामग्रीच्या ७० टक्के जागतिक व्यापारासाठी फक्त पाच देश जबाबदार होते आणि पवन ऊर्जेच्या क्षेत्रामध्ये, एकूण व्यापाराच्या ८० टक्के निर्यात करणारे चार देश होते. लिथियम-आयन विद्युतघटाचे (LiB) उत्पादन देखील काही देशांमध्ये एकवटलेले आढळते. एकूण व्यापाराच्या ७० टक्के व्यापार फक्त चार देशांनी केला.



सध्या नवीकरणीय ऊर्जा निर्मितीवर अत्यंत भर आहे आणि व्यापार ओघामुळे ऊर्जा सुरक्षेसाठी धोका निर्माण झाला आहे हे ओळखून स्थानिक उत्पादनावर लक्ष केंद्रित करून उत्पादन वाढविण्याकडे लक्ष देण्याची निकड आणि मुख्य सामग्री, महत्त्वाची खनिजे आणि नवीन ऊर्जा प्रणाली घटकांसाठी आवश्यक असलेल्या पुरवठा साखळयांचे वैविध्य सदस्य देशांनी अधोरेखित केले. हरित हायड्रोजन/अमोनियाला प्रोत्साहन देण्यासाठी यावेळी मोठे समर्थन होते. काही सदस्यांनी, याव्यतिरिक्त, अल्प - कार्बन हायड्रोजन तंत्रज्ञानाच्या संपूर्ण श्रेणीचा विचार करून प्रस्ताव ठेवला. वित्तपुरवठा खर्च कमी करण्यासाठी उत्प्रेरक सार्वजनिक क्षेत्रातील वित्तासह खासगी क्षेत्राच्या वित्तपुरवठ्याकडे लक्ष देण्याच्या गरजेवर यावेळी प्रस्ताव मांडण्यात आले. तसेच निमंत्रित देशांनी ग्लोबल साउथच्या आवश्यकता लक्षात घेण्याची गरज निदर्शनास आणली. या तंत्रज्ञानातील गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारांनी स्पष्ट दीर्घकालीन संकेत देण्याच्या गरजेवरही त्यांनी भर दिला.

सदस्य देशांनी ऊर्जा कार्यक्षमतेला निः कार्बनीकरण अर्थव्यवस्थेत पहिले इंधन म्हणून मान्यता दिली आणि त्यांनी या संदर्भात स्वीकारलेल्या अनेक राष्ट्रीय धोरणांवर प्रकाश टाकला. २०३० पर्यंत ऊर्जा कार्यक्षमतेत सुधारणा करण्याकरिता जागतिक दर दुप्पट करण्यासाठी आराखडा प्रस्तावित करण्याच्या अपेक्षित परिणामासाठी चांगला दृष्टिकोन प्रदान करते. हरित विकास आणि हरित नोकऱ्या निर्मितीचे साधन म्हणून उद्योग आणि वाहतुकीच्या विद्युतीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले गेले.

आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या अहवालांनुसार, परवडण्याच्या मुद्द्यामुळे कोविड संकटानंतर जगात ७५ दशलक्ष लोक वीज उपलब्धता गमावण्याची शक्यता आहे. आणि स्वच्छ स्वयंपाकासाठी, जिथे आपल्याकडे आधीच २.४ अब्ज लोक आहेत ज्यांना जागतिक स्तरावर स्वच्छ स्वयंपाक तंत्रज्ञान आणि इंधन उपलब्ध नाही, अतिरिक्त १०० दशलक्ष ज्यांना स्वच्छ स्वयंपाकाचा वापर होता त्यांना ते परवडणारे नाही. सदस्यांनी सहमती दर्शवली की कोणत्याही ऊर्जा संक्रमणात, सर्वांसोबत वाटचाल करत शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये किमान वस्तुविनिमय सुनिश्चित करणे आवश्यक आहे. काही सदस्य देशांनी ऊर्जा सुरक्षा बाबींची पूर्तता करण्यासाठी नैसर्गिक वायूला संक्रमणकालीन जीवाश्म इंधन म्हणून निवडण्याची गरज निदर्शनास आणून दिली, तर भविष्यासाठी स्वच्छ ऊर्जा संक्रमणात विशेषत: इथेनॉल ते कॉम्प्रेस्ड बायोगॅस ते हरित हायड्रोजन यात इंधनाची विस्तृत श्रेणी खूप मोठी भूमिका बजावेल याबाबत गटाने सहमती दर्शवली. लेखक हे केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाचे सचिव आहेत)


**- आलोक कुमार.**

## टुडेज् ब्लॉग

# शिक्षण क्षेत्राचे अभ्यासपूर्ण विवेचन

**एक विषय : शिक्षण, एक लेखक : संदीप वाकचौरे, एक प्रकाशक : घनश्याम पाटील (चपराक प्रकाशन पुणे) या त्रिवेणी संगमाची फलश्रुती म्हणजे नुकतेच प्रकाशित झालेले 'पाटी पेन्सिल' हे वाकचौरे यांचे तिसरे पुस्तक! संदीप वाकचौरे हे अभ्यासू शिक्षण अभ्यासक आहेत. शिक्षण क्षेत्रात होणाऱ्या बदलांवर ते बारकाईने लक्ष ठेवून असतात. होणाऱ्या बदलांचा विद्यार्थी, शिक्षक, पालक, शासन, समाज या महत्त्वाच्या घटकांवर काय आणि कसा सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम होतो याची विविध माध्यमांवर ते सखोल चर्चा करतात.**

'पाटी पेन्सिल' पुस्तकात वाकचौरे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण असे ३५ लेख लिहिले आहेत. शिक्षण क्षेत्र एक महासागर आहे. कितीही दूर जा, कितीही खोलवर जा, हाती अमृतच येईल. जेव्हा संदीप वाकचौरे यांच्यासारखे पट्टीचे अभ्यासक या महासागरात यथेच्छ विहार करतात त्यावेळी त्यांना शंख, शिंपले, मोती याप्रमाणे काही नको असलेल्या गोष्टीही सापडतात. नंतर यथावकाश ते सापडलेले सारे काही अक्षराच्या कोंदणात बसवून सादर करतात.




विद्यार्थ्याला या ना त्या कारणाने शाळेतून बाहेर काढणे हे बालमनाला नैराश्यात ढकलणारे आहे. त्याच्या आत्मसन्मानाला धक्का देणारे आहे. हा धक्का मुलांच्या मनावर आणि शरीरावर दीर्घकाळ परिणाम करणारा असतो. अशा आशयाचे विचार 'पाटी पेन्सिल' लेखात मांडून लेखक शाळेतील फी ठरविण्याचा अधिकार पालक सभेला द्यावा, अशी सूचना करतात तेव्हा आठवते, शाळा-शाळांमधून असणाऱ्या पालक सभा कार्यान्वित आहेत का? शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी या त्रिकोणात पालक कुठे असतात? केवळ पालक सभेला हजेरी लावली म्हणजे संपले सारे असे होते का? खेडोपाडी तर अनेक वेळा पालक समिती सदस्यांच्या घरी जाऊन स्वाक्षऱ्या घ्याव्या लागतात हे चित्र बरोबर वाटते का?

'भुकेचे करायचे काय?' या लेखात लेखकाने जागतिक भूक निर्देशांकाची चर्चा करताना शालेय पोषण आहाराचे वास्तव समोर ठेवले आहे. शालेय पोषण आहाराचा विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर सकारात्मक परिणाम झाला आहे का हा खरा संशोधनात्मक विषय आहे. शरीराची भूक भागली पण ज्ञानाच्या भुकेचे काय? अर्थात पोटाची भूक भागली असं म्हणणंही थोडं धाडसाचं ठरेल.

महाराष्ट्र म्हणजे 'शिक्षणाची प्रयोगशाळा' ही आपल्या राज्याची ओळख सर्वदूर आहे. आता राज्य सरकारच्या शालेय शिक्षण विभागाने ४८८ शाळा आदर्श करण्याचे ठरविले आहे, परंतु अंमलबजावणीचे काय? अंमलबजावणीचे घोडे गवत खात असेल तर मग कोवळ्या, फुलणाऱ्या कळ्यांचे काय? 'आपलं राज्य एक प्रयोगशाळा' हे चांगलं वाटत असलं तरीही ते किती लाभदायक आहे, यापूर्वी अनेक योजना आल्या नि गेल्या, त्यांचा सकारात्मक परिणाम झाला का? हेही विचारात घेणे गरजेचे आहे. कारण पुढील एका लेखात लेखक लिहितात, आपण शिक्षणात अक्षराची साक्षरता पेरत गेलो, मात्र शिक्षणातून अपेक्षित असलेल्या मूल्यांचा विचार रुजवायचा राहिला तर नाही ना? अशी शंका येते. अभ्यासक्रमात गाभा घटक, जीवनकौशल्य आणि मूल्यांचा विचार अधोरेखित केला गेला आहे, मात्र प्रत्यक्षात तो विचार अंमलबजावणीत आला असता तर आपल्याला वर्तमानात दिसणारी परिस्थिती निश्चित नियंत्रणात आली असती.'

एकेकाळी गाभाभूत घटकांचा आणि मूल्य शिक्षणाचा एवढा गाजावाजा झाला होता तो लक्षात घेता आणि आता लेखकाचे विचार वाचताना असे वाटते की सारेच मुसळ केरात गेले की काय? कारण लेखक म्हणतात त्याप्रमाणे प्रामाणिकपणा हे मूल्य रुजले असते तर एवढा भ्रष्टाचार माजला नसता.' हे निश्चित खरे आहे, पण मूल्य रुजविण्याची जबाबदारी केवळ शिक्षकांचीच आहे का? समाज, पालक हे नामानिराळे राहू शकतात का? शाळेत विद्यार्थी सहा-सात तास असतो. उर्वरित काळात तो घरात आणि समाजात असतो. ते वातावरण आणि शाळेतील मूल्य शिक्षण किती विरोधाभास आहे ना? त्यामुळे विद्यार्थी संभ्रमात पडतो आणि जे सहज साध्य असेल तिकडे वळतो. 'शाळा हे मंदिर,' असे माजी शिक्षण संचालक वि. वि. चिपळूणकर यांचं मत होतं. तसे मानले तर या मंदिरातून बाहेर पडलेले काही विद्यार्थी पालकाला शोधायला मदिरालयात जात असतील तर कशाचे मूल्य नि कोणता गाभाभूत घटक आपण जोपासत आहोत?

परीक्षा! अभ्यासक्रमाच्या पूर्ततेसाठी करावा लागणारा एक सोपस्कार! परंतु या मूल्यमापनातून पास-नापास आणि आशा-निराशा असे दोन गट पडतात. हे धोकादायक ठरू शकते. यासंदर्भात लेखक चिंतनीय अशी प्रश्नपत्रिका सादर करतात. विद्यार्थी पुस्तकी परीक्षेत नापास झाले तरी जगण्यासाठी लागणारी सक्षमता प्राप्त करू शकले का? शिक्षणाच्या प्रक्रियेत शिकणे महत्त्वाचे नाही का? मुळात आपण का शिकतो? शिक्षण देणाऱ्या संस्था समाजाने का निर्माण केल्या? या प्रश्नांची उत्तरे संबंधित घटकांनी दिली पाहिजेत, अर्थात त्यांना ह्या प्रश्नांमागचे गांभीर्य समजायला हवे.

**- नागेश शेवाळकर.**

## जन्म हा अखेरचा

### ज्ञानाचारस्थल




म्हणून शास्त्राने श्रीगुरुला चालता बोलता देव मानला आहे. गुरुच आपल्या मनातील शंकांचे निरसन करुन आपल्याला आत्मकल्याणाची वाट दाखवित असतो. काशीच्या जंगमवाटिकेत होऊन गेलेल्या जगद्गुरुंनी समस्त मानवजातीला आत्मकल्याणाचा मार्ग दाखवून दिलेला आहे. तुम्ही ऐकले आहे की, जगद्गुरु विश्वाराध्यांनी या ज्ञानपीठाची स्थापना केली आहे. आपले जीवितकार्य संपवण्याआधी त्यांनी आपले पट्टशिष्य श्री मल्लिकार्जुन महास्वामीजींना पीठाधिकार दिला. त्यानंतर ज. विश्वाराध्य विश्वेश्वर लिंगात विलीन झाले.

ज. मल्लिकार्जुन महास्वामीजी तीनशे अकरा वर्षे पीठाधिकारी होते, असे इतिहासात नमूद आहे. त्यानंतर त्यांनी संजीवन समाधी घेतली. कैलासमंटपात ज. विश्वाराध्यांच्या मूर्तीखाली त्यांची समाधी आहे. श्रद्धाळू, साधक आणि सिद्ध इत्यादी लोकांना त्यांचे दर्शन घडल्याचेही सांगण्यात येते. त्यानंतर झालेल्या अनेक जगद्गुरुंनी 'मल्लिकार्जुन महास्वामीजी' हेच नाव धारण करुन कार्य केले आहे. जवळ जवळ सत्तर जगद्गुरुंनी हेच नाव धारण केले होते. ५१व्या जगद्गुरुंच्या काळात काशीच्या जयनंददेव नरेशाने गाई चारण्यासाठी भूमी दान केली. त्या दानपत्रात त्या भूमीला 'जंगमपूर' असे म्हटले असून आज त्या जागेवर काशी हिंदू विश्वविद्यालय उभे आहे. अनादिकालापासून या पीठावर ज्ञानी आणि तपस्वी जगद्गुरुंची परंपरा चालत आली आहे. त्यांच्या कृपाशीर्वादाने आजदेखील या ज्ञानपीठाद्वारे धर्मप्रसार-प्रचार कार्य अखंड चालू आहे. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# महाराष्ट्रात वीज अत्यंत महाग; नवीन उद्योगांना मोठी समस्या

देशातील इतर राज्यांचा विचार करता महाराष्ट्रात वीज महाग आहे. महाराष्ट्रातील ग्राहकांना प्रति युनिट किमान ५ रुपये ३६ पैसे तर कमाल १५ रुपये ५६ पैसे या दराने वीज बिल भरावे लागते. या उलट देशातील सिक्कीम राज्याचा विचार केल्यास सर्वात कमी म्हणजे प्रति युनिट १ रुपया तर जास्तीत जास्त ४ रुपये दराने वीज मिळते. दिल्ली, गोवा, लक्षद्वीप, दिव-दमण येथे १ रुपया ६० पैसे दराने सामान्य ग्राहकांना वीज मिळते. आंध्रप्रदेश, तेलंगणा या राज्यात १ रुपया ९५ पैसे या दराने वीज मिळते तर हरियाणा राज्यात २ रुपये प्रति युनिट या दराने वीज मिळते ही बातमी नुकतीच वाचली.




देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वीज महाग का असावी? या कारणामुळे अनेक उद्योग महाराष्ट्रात येण्यास अनुकूल नसतात. नवीन उद्योग येताना वीज हा घटक महत्वाचा असतो.शासनाने हे वीज दर कमी कसे होतील? याकडे लक्ष द्यावयास पाहिजे याउलट आता महाराष्ट्रातील वीज दर अधिक असताना नव्याने पुन्हा दरवाढ करण्याचा प्रस्ताव महावितरणाने ठेवला आहे. नवीन उद्योगाला पाणी, वीज व मनुष्यबळ हे तीन महत्वाचे घटक आवश्यक आहेत. या दृष्टीने विचार केल्यास महाराष्ट्रात पाणी व मनुष्यबळ यांची कमतरता नाही, पण विजेचे वाढते दर ही नवीन उद्योगांना भेडसावणारी मोठी समस्या आहे. **- शांताराम वाघ, पुणे.**

### प्लास्टिकचा पर्यावरणावर विपरीत परिणाम



मानवी रक्तात मायक्रो प्लास्टिकचे कण सापडल्याचे संशोधन धक्कादायक प्रकार आहे. प्लास्टीकचा वाढता वापर ही समस्या खूपच वाढली असून कचऱ्यात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक असते. पर्यावरणावर याचे होणारे विपरीत परिणाम गांभीर्याने घेतले नाही तर भावी काळात कठीण परिस्थिती असेल.

**- अर्चना काळे, पुणे.**

# क्रांतिकारकांचे गुरु



## वस्ताद लहुजी साळवे

आज १७ फेब्रुवारी, स्वातंत्र्यसंग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले, त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती, मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकारांनी घेतली नाही. म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे (राऊत) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रागाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजींने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली. मात्र, या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्यप्राप्तीची ज्वाला भडकली.

भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले, त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करताना 'मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी' अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यातील रास्तापेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी साताराचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले.

छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र, बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले. मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनव्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजींचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतिकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले. या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला.

भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्यासारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले, म्हणूनच त्यांना 'क्रांतिकारांचे गुरू' असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत. त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, दौंड.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# 'स्काडा'अंतर्गत वॉल, वॉटर मीटर बसविण्यास वेग

## स्मार्ट सिटीचे मुख्य तांत्रिक अधिकारी चौबे यांची माहिती

सुराज्य/सोलापूर

सोलापूर स्मार्ट सिटी योजनेंतर्गत स्काडा नियंत्रण प्रणालींचे कामे गतीने सुरू आहेत. पाकणी प्लांट येथे इनलेट व आउटलेटवर वॉटर मीटर बसवून घेण्यात आले तसेच कोंडी एमबीआर, एच.एस.आर, सिध्देश्वर प्रशाले जवळ, कलेक्टर कचेरी पंचायत समिती ऑफिसच्या बाजूला वॉल्व व मीटर बसविण्याचे काम करण्यात आले आहे, अशी माहिती अशी माहिती स्मार्ट सिटीचे मुख्य तांत्रिक अधिकारी व्ही.बी. चौबे यांनी दिली.

स्मार्ट सिटीच्या सीईओ तथा महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या आदेशानुसार





सोलापूर स्मार्ट सिटी योजने अंतर्गत स्काडा नियंत्रण प्रणालींचे काम १० फेब्रुवारी पासून सुरू करण्यात आले आहे. २५ दिवस हे काम चालणार आहे. आजपर्यंत काही कामे करण्यात आली आहेत.या योजनेअंतर्गत उजनी जलवाहिनी, पाकणी जलशुद्धीकरण केंद्र, सोरेगाव जलशुद्धीकरण केंद्र, भवानी पेठ जलशुद्धीकरण केंद्र व टाकळी जलवाहिनी येथे विविध प्रकारचे उपगांची कामे करण्यात येत आहेत. ही कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी ५ रोटेशन मध्ये शटडाऊन घेण्यात येत आहे.उजनी येथील कामासाठी ३ रोटेशन, हिप्परगा,भवानी पेठ आणि रोटेशन तर एचएसआर भवानी पेठसाठी प्रत्येकी एक रोटेशन शटडाऊन घेण्यात येणार आहे. स्काडा अंतर्गत आत्तापर्यंत ही कामे झाली


पहिल्याच दिवशी उजनी लाईन पाकणी व एमबीआर येथील येथील कामे हाती घेण्यात आली. पाकणी प्लांट येथे इनलेट व आउटलेटवर वॉटर मीटर बसवून घेण्यात आले.

कोंडी एमबीआर येथे वॉल्व व मीटर बसवण्यात आले. एच.एस. आर येथे ७६२ मि.मी. व्यासाच्या पाईप लाईन वर वॉल व मीटर बसवून घेण्यात आले आहे. सिध्देश्वर प्रशाले जवळ वॉल्व व मीटर बसविण्यात आले. कलेक्टर कचेरी पंचायत समिती ऑफिसच्या बाजूला वॉल्व व मीटर बसून घेण्यात आले. पाकणी येथील काम झाले आहे. गुरुवारी कोंडी येथील काम करण्यात आले आहे.

यामुळे सोलापूर शहरातील पाणीपुरवठा दि. १० फेब्रुवारी २०२३ ते पुढील २५ दिवसांपर्यंत ३ ऐवजी ४ दिवसानंतर होणार आहे. ४ दिवसाआड होणाऱ्या पाणी पुरवठ्यात कोणताही बदल होणार नाही, असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### सर्व बाबींवर संगणकाद्वारे नियंत्रण ठेवले जाणार

स्काडा प्रणाली अंतर्गत उजनीपासून ते जलशुद्धीकरण केंद्रामध्ये शुद्ध करण्यापासून नागरिकांच्या घरी पोहचवण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया व नियंत्रण संगणकीय प्रणालीद्वारे केली जाईल. त्यासाठी महापालिकेतर्फे नियंत्रण कक्ष, पाण्याच्या टाक्या, अशा प्रत्येक ठिकाणी व्हॉल्व्ह व मीटर बसविण्यात येत आहेत. ज्यामधून किती पाणी उपलब्ध आहे ? पाण्याचा दाब किती प्रमाणात आहे ? किती पाणी सोडायचे आहे? यासारख्या अशा अनेक बाबींवर संगणकाद्वारे नियंत्रण ठेवले जाणार आहे. एकूणच शहराला नियोजनपूर्वक पाणीपुरवठा करण्यासाठी मदत होणार आहे.



## साम्राज्य आरमार शिवजन्मोत्सवनिमित्त रक्तदान शिबीर संपन्न

**कुर्डुवाडी** : कुर्डूवाडी शहरातील साम्राज्य आरमार संघटनेने शिवजयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिर आयोजीत केलेल्या रक्तदान शिबिरात ५३७ जणांनी रक्तदान त्यांनी सहभाग नोंदविला. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन प्रांताधिकारी जोती कदम, तहसीलदार राजेश चव्हाण, पोलीस निरीक्षक विक्रांत बोधे, गटविकास अधिकारी संताजी पाटील, पोलीस सहाय्यक निरीक्षक हनुमंत वाघमारे, डॉ. राजेंद्र दास, डॉ.विलास मेहता,डॉ.जयंत करंदीकर, असोसिएनचे डॉ. आशिष शहा यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे संस्थापक उमेश पाटील तर सूत्रसंचालन लक्ष्मण पवार यांनी केले. यावेळी भाजप प्रांतिक सदस्य गोविंदराव कुलकर्णी, डॉ लकि दोशी, डॉ.हर्षद शहा, डॉ.मयूर वाघमोडे, डॉ.हेमंत काळे, डॉ.विवेकानंद पाटील, डॉ.सचिन गोडसे, डॉ.रोहित दास, डॉ.अमित दोशी, भाजप महिला शहरअध्यक्षा प्रतिक्षाताई गोफणे, शिवसेना तालुका उपप्रमुख राजेंद्र वाल्मीकि, संतोष क्षीरसागर,प्रवीण सोमासे, कल्याण बागल, शेषराज करळे, अमोल कुलकर्णी, हरीश भराटे, सागर गायकवाड, सागर तरंगे, पोलीस कर्मचारी सागर सुरवसे, सोनवणे, राजकुमार बागल, संदीप भराटे, शार्दूल दातार, राहुल क्षीरसागर, सागर गोफणे, औंदुबर सुतार, बालाजी गायकवाड, अर्जुन रजपूत यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.

## आमदार श्रीकांत भारतीय यांच्याकडून तानवडे परिवाराचे सांत्वन

**अक्कलकोट** : जनसेवक स्व. आमदार बाबासाहेब तानवडे यांच्या प्रत्येक निवडणुकीत त्यांच्या खांद्याला खांदा लावून भाजप पक्ष वाढीसाठी प्रचंड कष्ट केले. प्रत्येक गाव, वाड्यावस्त्यावर भाजपचे कार्यकर्ते तयार केले. आमदार बाबासाहेब तानवडे यांच्या निधनानंतर अक्कलकोट तालुका भाजपची धुरा समर्थपणे सांभाळून पक्षाची सेवा आणि कार्यकर्त्यांना न्याय देण्यासाठी स्वर्गीय दत्तात्रय अण्णा तानवडे यांनी सदैव अग्रेसर राहिल्याचे आमदार श्रीकांत भारतीय यांनी सांगितले. सन २००३ सालच्या सोलापूर लोकसभा पोटनिवडणूक स्व प्रतापसिंह मोहिते पाटील यांचे निवडणूक प्रमुख स्वर्गीय दत्तात्रय तानवडे होते. त्यावेळी दत्ताआण्णाचा सहवास मला लाभला. त्यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष बलभीम शिंदे होते. यावेळी त्यांच्या समवेत माळशिरसचे भाजप नेते के.के. पाटील व बार्शीचे कोल्हे, निर्मला तानवडे, विजय तानवडे, आनंद तानवडे, प्रशांत तानवडे, प्रवीण तानवडे, रेवणसिध्द बिराजदार उपस्थित होते.



## ज्ञानसंपदा प्रशालेत रंगली हुरडा पार्टी

**सोलापूर** : महाविद्यालयाच्या प्रांगणात हुरडा पार्टीचे उत्साहात आयोजन करण्यात आले. ड्रीम फाउंडेशन, सोलापूर व बसव संगम शेतकरी गट, सोलापूर चे अध्यक्ष काशीनाथ भतगुणकी व सौ. संगीता भतगुणकी यांच्या मार्फत शाळेच्या प्रांगणात निसर्गरम्य वातावरणात हुरडा पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रशालेतील सहशिक्षक धर्मसाले यांनी विद्यार्थ्यांना हुरडा म्हणजे काय ? आगटी कशी पेटवतात? आगटीमध्ये हुरडा कसा भाजला जातो ? हे सर्व प्रात्यक्षिक करून समजावून सांगितले. या वेळी विद्यार्थ्यांनी हुरडा, शेंगा चटणी, खोबरे चटणी, गूळ, फरसाण यासोबतच पेरू, बोरं, चिकू, पपई, अननस, कलिंगड, काकडी, ढाळा या सारख्या रानमेव्याचा आस्वाद घेतला. प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सिद्धारुढ बेडगनूर, बसव संगम शेतकरी गटाचे काशीनाथ भतगुणकी, संगीता भतगुणकी, परशुराम कोकणे, सरस्वती कोकणे, प्रशालेचे मुख्याध्यापक ओंकार बेडगनूर, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मनोहर बेडगनूर शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते.



## जगाने शिवाजी महाराजांची प्रेरणा घेतली : प्रा. डॉ. हनवते

**सोलापूर** : महाराष्ट्रातील सोलापूर शहर हे सांस्कृतिक, ऐतिहासिक असे शहर आहे. ही भूमी हुतात्म्यांची आहे. त्यामुळे या शहराला अधिक महत्त्व आहे. सर्व जगातील देशांनी छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा घेऊन आपले कार्य केले आहे , असे प्रतिपादन प्राध्यापक प्रेम हनवते यांनी केले. मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते शिवराय हे मानवतावादी, समतावादी व विज्ञानवादी होते. हे राज्य रयतेचे आहे. त्यात सर्वांना अधिकार आहे. छत्रपती शिवरायांचे राज्य हे विशिष्ट जाती-धर्माचे होते. प्रास्ताविक जनरल सेक्रेटरी प्रा. महेश माने यांनी केले. तरी आभार उपाध्यक्ष विनायकराव पाटील यांनी मानले. तर सूत्रसंचालन सारीका महामुनी-पंडीत यांनी केले. यावेळी यावेळी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे, नामदेव थोरात, अशोक चव्हाण, शिवदास चटके, सुनिता साळुंके, सुजाता जुगदार, प्राचार्य डॉ. अनिल बारबोले, राजेंद्र शिंदे, उषा गोकुळे, संजीवनी मुळे, श्रीपती जगदाळे, महानंदा सोलापूरे, डॉ. मधूकर पवार, नागनाथ नवगीरे, दत्ता भोसले उपस्थित होते.

## माझे टॅलेंट शोधण्यात शिक्षणक्षेत्र अपयशी : इंद्रजीत भालेराव

सुराज्य/बार्शी

मी चौथीत फुकट पास सातवीत वरच्या वर्गात ढकललेला तर मॅट्रिकला नापास असताना माझी संपूर्ण भगवद्गीता पाठ होतीआमच्या महानुभव पंथाची सर्व सूक्ते मुखोद्गत होती बहिणाबाईंच्या कविता पाठ होत्या जात्यावरील ओव्यांच्या पाठांतरांची तर गणतीच नव्हती अशा तऱ्हेने मी माझं मेरिट सिद्ध केलं पण माझं टॅलेंट शोधण्यात मात्र तथाकथित शिक्षणक्षेत्र अपयशी ठरल्याचे ज्येष्ठ साहित्यिक व कवी इंद्रजीत भालेराव यांनी प्रतिपादन केले आहे.

शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवशक्ती अर्बन को-ऑपरेटिव्हशिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवशक्ती अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या विद्यमाने आयोजित कर्मवीर डॉक्टर मामासाहेब जगदाळे व्याख्यानमालेत तिसरे गुप्त गुंतताना भालेराव बोलत होते. तिसऱ्या आणि अखेरच्या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी वाय यादव होते. यावेळी माजी नगराध्यक्ष आसिफभाई तांबोळी, यशोदा शिक्षण समूहाचे अध्यक्ष अरुण बारबोले, संस्थेचे जॉईंट सेक्रेटरी अरुण देबडवार,बँकेचे अध्यक्ष डॉ. प्रकाश बुरगुटे, माजी प्राचार्य व. न इंगळे, चंद्रकांत मोरे उपस्थित होते.





इंद्रजीत भालेराव यांनी आपल्या निवडक काव्यसंग्रहातील काही कवितां वर त्या गाऊन दाखवत त्यावर भाष्य केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवछत्रपती आणि मामासाहेब जगदाळे यांच्या फोटो प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

माझ्या सर्व कविता शेतकरी या विषयावरच केंद्र असल्याने शेतकरी समाज प्रवाहात आणला गेला असं निदर्शनास आणून भालेराव शेवटी म्हणाले, आपल्यावर कधी कोणती वेळ येईल सांगता येत नसल्याने अशावेळी खचून न जातात येईल त्या परिस्थितीला धैर्याने तोंड दिला पाहिजे असा उपस्थितांना सल्ला दिला. कार्यक्रमास शहर आणि परिसरातील श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्राध्यापक अशोक वाघमारे आणि हनुमंत चव्हाण यांनी तर तर आभार सहा. सरव्यवस्थापक गणेश बारंगुळे यांनी मानले.

## १५ फूट उंचावरून पडल्याने मजूर जखमी

सुराज्य/वडाळा

वडाळा (ता.उत्तर सोलापूर) येथील सरकारी दवाखान्याजवळ बांधकाम करताना १५ फूट उंचावरून खाली पडल्याने माणिक दाजी शेंबडे (वय ५० रा. वडाळा) हे मजूर जखमी झाले. ही घटना गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली.त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. ते बांबूचा परांच्या लावून बांधकाम करीत होते. त्यावेळी हा प्रकार घडला. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

विष प्राशन केलेल्या तरुणाचा मृत्यू शेळगी येथील बसवराज नगरात राहणाऱ्या धर्मराज सिद्धप्पा व्हनमोरे (वय ३०) याने विष पिऊन आत्महत्या केली.२७ जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास त्याने राहत्या घरात अज्ञात करणावरून विष प्राशन केले होते. त्याला शिवम्मा मगरूमखाने (मावशी) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान तो गुरुवारी दुपारी मरण पावला. या घटनेची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे.





## युवकांनी जबाबदारीचे भान ठेवून ध्येयाकडे वाटचाल करावी : डॉ. सोडल

### श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानचा युवा प्रेरणा पुरस्काराचे वितरण

सुराज्य/सोलापूर

जग बदलत आहे. जीवनात संघर्ष हा अटळ आहे. युवकांनी जबाबदारीचे भान ठेवून ध्येयाकडे वाटचाल केली पाहिजे. देशाने काय दिले याचा विचार करण्यापेक्षा मी काय दिले. काय देऊ शकतो याचा विचार करायला हवा, असे आवाहन डफरीन महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर सोडल यांनी केले.

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने युवा दिनाचे औचित्य साधून युवा प्रेरणा पुरस्कार वितरण सोहळा रविवारी दुपारी रंगभवन समोरील समाजकल्याण केंद्रातपार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून डफरीन महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर सोडल, उद्योजक हर्षल कोठारी, रेल्वेचे कर्मचारी व कल्याण मुख्य निरीक्षक सचिन बनसोडे , पद्मावती बालक आश्रमच्या संचालिका ज्योत्स्ना पाटील, उद्योजक राहुल चंडक, पंचशील माध्यमिक प्रशालेचे अध्यक्ष श्रीशैल रणधिरे, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश कासट आदी मान्यवर उपस्थित होते.


संस्थापक महेश कासट यांनी प्रास्ताविक भाषणात प्रतिष्ठानच्या आजपर्यंतच्या कार्याचा आढावा सांगितला. सूत्रसंचालन राहुल बिराजदार केले तर गणेश येळमेली यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केशव भैय्या, मेहुल बुरे, शंकर बंडगर, शिवशंकर जवळे, योगिनाथ फुराली, रेवन कोळी, दीपक कारकी, शुभम कासट, अभिजित व्होनकळस, संतोष अंलकुटे, साहेबराव परबत, आकाश लखोटिया, दिनेश मंत्री, भारती जवळे, शुभांगी लचके, पुष्पा अलमेलकर, सारिका मदने, कोमल चंडक, अर्चना बंडगर आदींसह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

**यांचा झाला पुरस्काराने सन्मान**

यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे अँड.सुमित रयोजी, उद्योजिका सोनाली खानापूरे, डॉ.सुमित तंबाके, राज्यभर निरीक्षक बुध्दजय भालशंकर, ९५ एफ.म.चे आरजे अमृत ढगे, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद कांरडे आदी मान्यवरांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे हे तिसरे वर्ष आहे.

## तक्रार मागे घेण्यासाठी खंडणी मागितली

**मंगळवेढा** : पोलिसात दिलेली तक्रार मागे घेण्यासाठी ५९ हजाराची खंडणी मागितल्याची घटना मंगळवेढा येथे मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात मंगळवेढाच्या पोलिसांनी तिघा विरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात मधुकर राजाराम मोरे (वय ४७ रा.डोंगरगाव ता.मंगळवेढा) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी धोंडीबा कुंडलिक साखरे, बाबासाहेब शब्बीर सय्यद (रा.मंगळवेढा) आणि शब्बीर जाफर सय्यद (रा.डोंगरगाव) अशा तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मधुकर मोरे हे मंगळवारी सायंकाळच्या सुमारास मंगळवेढा येथील मेटकरीच्या कॅन्टीन जवळ त्यांच्या मामासोबत बोलत थांबले होते. त्यावेळी साखरे याने मी तुझ्यावर केलेली ट्रॉसिटीची केस माघारी घेतो. तुला त्रास होऊ देत नाही. मला ५० हजार रुपये दे अशी मागणी केली. आणि पैसे नाही दिल्यास खोट्या तक्रारीची धमकी दिली. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार पवार करीत आहेत.



## शहर काँग्रेसच्या वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे यांची निवड

सुराज्य/सोलापूर

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीकडून शहर आणि जिल्ह्यातील कार्याध्यक्षपद बरखास्त करण्यात आले आहे. आता केवळ प्रदेशवरच कार्याध्यक्ष असणार आहेत. कार्याध्यक्षपदाऐवजी आता वरिष्ठ उपाध्यक्षाची निर्मिती करण्यात आली आहे.

त्यानुसार सोलापूरच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी ज्येष्ठ नेते सुनील रसाळे यांची निवड करण्यात आली आहे.

शहर- जिल्हा काँग्रेसमध्ये पूर्वी कार्याध्यक्षपद अस्तित्वात होते. आता कार्याध्यक्षपद बरखास्त करून वरिष्ठ उपाध्यक्षपदाची निर्मिती करण्यात आली आहे. हा आदेश अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने काढला आहे.

आता कार्याध्यक्ष केवळ प्रदेशवर असणार आहेत. गुरूवारी प्रदेश काँग्रेसकडून काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांना सुनील रसाळे यांची वरिष्ठ उपाध्यक्षपदी निवड केल्याचे पत्र आले आहे. निवडीनंतर रसाळे यांची माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी सत्कार केला. यावेळी सुरेश हसापुरे, विनोद भोसले, राजन कामत आदी उपस्थित होते.

### हेमगड्डी, यलगुलवारांचे अद्याप पत्र नाही

शहर काँग्रेसमध्ये सध्या संजय हेमगड्डी आणि मनोज यलगुलवार हे कार्याध्यक्ष आहेत. नव्या आदेशानुसार त्यांची वरिष्ठ उपाध्यक्षपदी वर्णी लागण्याची शक्यता आहे. मात्र अद्याप त्या दोघांच्या नावाचे पत्र आले नसल्याचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी सांगितले.

# ३४० अत्यावश्यक पदाची करणार भरती

## ३५ टक्के आस्थापना खर्चाची अट शिथिल

सुराज्य/सोलापूर

राज्य शासनाने स्थानिक स्वराज्यसंस्थांकडेनोकरभरतीसाठी ३५ टक्के आस्थापना खर्चाची अट शिथिल केली आहे. यामुळे आता सोलापूर महापालिकेतील ३४० अत्यावश्यक पदाची भरती प्रक्रिया लवकरच राबविण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी दिली.

राज्य शासनाने राज्यातील महापालिका नगरपालिकेतील नोकर भरतीसाठी ३५ टक्के



आस्थापना खर्चाची अट शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे सोलापूर महापालिकेतील आवश्यक पद भरती करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महापालिका प्रशासनाकडून यापूर्वी ३४० अत्यावश्यक पदांच्या भरतीसाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. या शासनाची मान्यता मिळाली आहे. ती पद भरती प्रक्रिया लवकरच राबविण्यात येणार आहे. वास्तविक पाहता महापालिकेतील सुमारे ११२५ पदेही रिक्त आहेत. त्यापैकी ३४० अत्यावश्यक पदे भरण्यात येणार आहेत. यामध्ये कनिष्ठ अभियंता, उद्यान कर्मचारी, अग्निशामक दल यासह अत्यावश्यक पदांचा समावेश राहणार आहे. शासन नियमानुसार टीसीएस या कंपनीशी भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात करारनामा या आठवड्यात करण्यात येणार असल्याचेही महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी स्पष्ट केले आहे.

### आस्थापना खर्च ४३ टक्क्यांवर जाणार

शासन नियमानुसार आस्थापना खर्च मर्यादा ३५ टक्के असते. ती शिथिल करण्यात आली आहे. सोलापूर महापालिकेतील आस्थापना खर्च सध्या ४१ टक्के आहे. त्यानंतर आता ३४० अत्यावश्यक पदाची भरती झाल्यानंतर सोलापूर महापालिकेचा आस्थापना खर्च १.७० टक्केने वाढून ४३ टक्क्यांवर जाणार असल्याचेही महापालिका आयुक्तांनी सांगितले.

### लवकरच मिळणार कर्मचाऱ्यांना पदोन्नती

रोस्टर प्रक्रिया पूर्ण झाली आहे. दरम्यान, महापालिकेतील पात्र कर्मचाऱ्यांना लवकरच पदोन्नती देण्यात येणार आहे. त्या संदर्भात महापालिका सामान्य प्रशासन विभागाला आदेश दिले आहेत. लवकरच डीपीसी गठीत करून ही कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी स्पष्ट केले.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM RE-TENDER-II NOTICE**

Digitally signed online bids are invited through RE-Tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered contractors of MSETCL. **RFx No. 7000026051 RE-Tender No.:** EE/400kV/R.S/DN/LBT/-Tender: 09/2022-2023 **Particulars:** Work of providing & fixing of motorized isolators drive mechanism box type - MT 50 for 220 kV ABB make motorized isolator installed at 400 kV R.S. Division, Lamboti. **Estimated Cost:** Rs. 13,22,040/- **EMD (Approx. 1% of Est. Cost):** Rs. 13,220/- **Tender Cost:** Rs. 500/- + 5% GST i.e. 525/- **Sale Period:** 16.02.2023 to 23.02.2023 **Last Date of Submission:** 23.02.2023 up to 14:00 Hrs **Date of Opening (Tech. Bid):** 23.02.2023 at 16:00 Hrs (If possible).

**Contact Person:** Executive Engineer - 7447441034.

For further details, please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-
Executive Engineer
400 kV R.S. Div., Lamboti**

CMYK

# राजेंद्रकुमार जाधवांची 'मॅट'मध्ये धाव; हेमंत निकम अधांतरी

## ■ पुढील सुनावणी २३ फेब्रुवारीला, शासनला केली विचारणा

सुराज्य/सोलापूर

**उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रमांक एकचे हेमंत निकम यांची बदली झाली करत सातारा येथिल वाई येथील उपविभागीय अधिकारी राजेंद्रकुमार जाधव यांच्या बदलीने रिक्त झालेल्या जागी नियुक्ती केली होती. मात्र जाधव यांनी बदलीच्या विरोधात मॅट मध्ये धाव घेत दावा दाखल केला आहे. या संदर्भात मॅटच्या न्यायालयाने राज्यशासनाकडे खुलास मागितला आहे. त्यामुळे पदभार घेण्यासाठी गेलेल्या निकम यांना गेली पाच दिवस झाले पदाभार विना अधातंतरी राहावे लागले आहे. या प्रकरणाची सुनावणी आता २३ फेब्रुवारी रोजी होणार आहे.**



शासनाने एकतर्फी कार्यमुक्त आदेश काढत निकम यांची सातारा येथिल वाई येथील उपविभागीय अधिकारी राजेंद्रकुमार जाधव यांच्या बदलीने रिक्त झालेल्या जागी नियुक्ती केली होती. तसेच त्यांना तात्काळ पदभार घेण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे निकम बुधवारी वाईत जाऊ पदभार घेण्यासाठी गेले आणि वाईत ठिय्य मारला मात्र वाईचे प्रांतअधिकारी जाधव यांनी बदलीच्या विरोधात मॅटमध्ये धाव घेतली आहे. आपला कार्यकाल अद्याप पुर्ण झालेला नाही बदलीच्या यादीमध्ये नाव नसताना अचानक बदली झाली आहे. बदली बेकायदा असल्याचे म्हणात दाव ठोकला आहे, मॅटचे न्यायाधिश ए.पी. कुरर्लेकर यांनी या प्रकरणात राज्यशासनास विचारणा करत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तर जाधव यांच्या बदली तात्पुरती स्थगिती दिल्याने पदभार घेण्यासाठी गेलेल्या निकम यांचा पदभार विना राहावे लगात आहे. हेमंत निकम यांच्यावर भूसंपादनप्रकरणी विभागीय आयुक्तांकडून चौकशी लावण्यात आली आहे. जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी त्यांच्यावर भूसंपादन प्रक्रियेत जाणीवपूर्वक पावणेतीन कोटी रुपये नुकसानभरपाई ज्यादा दिल्याचा अहवाल विभागीय आयुक्तांना पाठवला होता. याबाबतची तक्रार प्रदीप शितोळे, माजी आ. दिलीप सोपल यांनी केली होती.

निकम यांच्याकडे बार्शीचा देखिल पदभार होता. बार्शीमध्ये देखिल अनेक तक्रारी निकम यांच्या बाबत प्राप्त झाल्या विभागीय आयुक्तांना चौकशी समिती देखिल गठित करण्यात आली होती. ही समिती चौकशीसाठी सोलापूरात आलीच नाही त्यामुळे वेगळी चर्चा देखिल झाली निकम अनेक प्रकरणात वादाच्या भोवऱ्यात अडकत होते. त्यामुळे त्यांची शासनाने एकतर्फी कार्यमुक्त आदेश काढला होता. मात्र जाधव यांनी मॅट मध्ये जात बदलीला स्थगिती मिळवल्याने निकम पुन्हा अडचणीत आले आहेत.



## भगवती गौरीमाता महाविद्यालयातील इयत्ता बारावीचा निरोप समारंभ

**सोलापूर :** बृहन्मठ होटगी शैक्षणिक संस्था संचालित भगवती गौरीमाता प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून एस व्ही.सी.एस शिक्षण संकुल भवानी पेठ चे प्राचार्य राजकुमार भोरे, शालेय समितीचे सदस्य शिवशरण बिराजदार, प्राचार्य केदार माळी व पर्यवेक्षक रामेश्वर झाडे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या शुभ हस्ते श्री.वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व श्री. तपोरत्न योगिराजेंद्र शिवाचार्य महा स्वामीजी यांच्या प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलानाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रा. स्वामीनाथ कलशेट्टी यांनी प्रास्ताविकातून शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. नंतर अजय नवगिरे, सोनिया नवगिरे, शितल कलशेट्टी, सानिया मियावाले, संजिता बिराजदार, अंबिका खांडेकर, अंजली पांढरे, अश्विनी लामतुरे इत्यादी विद्यार्थ्यांनी संस्था, शाळेविषयी व गुरुजनाबद्दल ऋण व्यक्त केले. यावेळी रामेश्वर झाडे सरांनी मनोगत व्यक्त केले. तदनंतर प्रमुख पाहुणे एस व्ही सी एस भवानी पेठ शिक्षण संकुलाचे प्राचार्य राजकुमार भोरे यांनी विद्यार्थ्यांनी वाचन, मनन, चिंतन करून स्वतःच्या आरोग्याची काळजी घेऊन, बारावीच्या बोर्ड परीक्षेला मोठ्या आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य केदार माळी यांनी आपल्या मनोगताद्वारे स्पर्धात्मक युगात चिकाटी व सातत्याच्या जोरावर यशस्वी होण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा.मल्लिनाथ हुलसुरे, प्रा. सचिन होटगे व सिध्दाराम पुजारी, दत्ता ऐवळे कर्मचारी, तसेच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन रोहिणी बिराजदार व अंबिका खांडेकर तर आभार प्रा.दत्तात्रय बिराजदार यांनी मानले.

## विवेक वर्धिनी विद्यालयाचे चित्रकला स्पर्धेत यश

**सोलापूर :** परीक्षा पे चर्चा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २७ जानेवारी २०२३ रोजी परीक्षा पे चर्चा या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आले या स्पर्धेत ६५ विद्यार्थी सहभागी झाले होते. या चित्रकला स्पर्धेत गायत्री कुंभार हिने द्वितीय क्रमांक विशेष प्राविण्य मिळवले तिला पेंटिंग कॉम्पिटिशन तर्फे रोख दोन हजार रुपये सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र मिळवून तिने यश मिळविले तसेच लोकमंगल मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह बँक पंढरपूर यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत अंजली यादव,गायत्री कुंभार,रिया चव्हाण यांनी प्रथम,दुतीय व तृतीय क्रमांक मिळवले तसेच वैष्णवी भिसे, यावरी नदाफ यांनी यश संपादन केले आहे त्यांना संस्थेतर्फे सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार त्यांचा करण्यात आला या सर्व विद्यार्थ्यांना कलाशिक्षक मल्लिकार्जुन गुरव यांचे मार्गदर्शन लाभले सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. मदन क्षीरसागर, उपाध्यक्ष प्रा शिवाजी वाघ, सचिव अड. वैभव टोमके, प्राचार्य राजेंद्र पाराध्ये उपमुख्यापक तुकाराम कौलगे, पर्यवेक्षक सुनील पाटील, राजूभाई मुलाणी, मधुकर भोसले व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



## निमगाव ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या विरोधात शेख कुटुंबाचे उपोषण

**पिलीव :** माळशिरस तालुक्यातील मगराचे निमगाव येथील अफसर शेख यांना लिपीक पदावर रुजु करून घेण्यास ग्रामविकास अधिकारी सुरवसे हे वरीषठांचा आदेश असतानाही कामावर घेण्यास टाळाटाळ करीत आहेत. तरी त्यांच्यावर तत्काळ महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद सेवा शिस्त व अपील १९६४ नुसार शिस्त भंगाची कारवाई करुन त्यांना त्यांना तत्काळ नोकरीतुन निलंबित करण्यात यावे यासाठी अफसर शेख व त्यांच्या कुटुंबीयांनी सोलापूर जिल्हा परिषदेसमोर बेमुदत आमरण उपोषण सुरु केले आहे. आज त्यांच्या उपोषणाचा अकरावा दिवस आहे तरीही अद्याप कोणीही याची दखल घेतलेली नाही. मात्र जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत आम्ही उपोषण मागे घेणार नसल्याचे शेख कुटुंबीयांनी सांगितले.



## महावितरणवर निवड; रुपनवर यांचा सन्मान

**नातेपुते :** महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई ऊर्जा विभाग द्वारा महावितरणच्या सोलापूर जिल्हा समन्वयक पदी दत्तात्रय रुपनवर (महावितरण, अकलूज विभाग ता.माळशिरस) यांची नियुक्ती झाल्या बद्दल मामासाहेब पांढरे मित्रपरिवार व अतुल उद्योग समूह यांच्या वतीने दत्तात्रय रुपनवर यांचा अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती जननायक मामासाहेब पांढरे यांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी उद्योजक अतुल बावकर, मोहित जाधव, रणजीत काळे दादासाहेब लाळगे तसेच मामासाहेब पांढरे मित्र परिवारातील सदस्य उपस्थित होते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशान्वये तसेच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार राम सातपुते यांच्या शिफारशीने दत्तात्रय रुपनवर यांची नियुक्ती करण्यात आली. विद्युत संदर्भात ग्राहकांच्या अडचणी शेतकऱ्यांच्या समस्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत पोहोचवून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे मत दत्तात्रय रुपनवर यांनी यावेळी व्यक्त केले.

## कलावती साबळे यांचे निधन



**वेळापूर :** कलावती जालिंदर साबळे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धपकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. त्या रिपब्लिकन पक्षाचे वेळापूर शहराध्यक्ष शरद साबळे यांच्या मातोश्री होत.

# पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेला मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार जाहीर

सुराज्य/सोलापूर

मराठी भाषेसाठी दिलेले लक्षणीय योगदान व कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने सुरु केलेला आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ भाषावैज्ञानिक आणि साहित्य समीक्षक डॉ. अशोक रा. केळकर यांच्या नावाने देण्यात येणारा मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार, २०२२' (संस्था) महाराष्ट्र साहित्य परिषदेला जाहीर झाला आहे. २ लाख रुपये, सन्मान चिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

मराठी भाषा गौरवदिनी सोमवार दि. २७ फेब्रुवारी रोजी एका विशेष समारंभात हा पुरस्कार मुंबईत प्रदान करण्यात येणार आहे. अशी माहिती परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.मिलिंद जोशी यांनी दिली. प्रा. जोशी म्हणाले, या पुरस्कारासाठी कोणताही अर्ज न करता महाराष्ट्र साहित्य परिषदेने आजवर केलेल्या कामाची दखल घेतली गेली याचे समाधान वाटते. परिषदेच्या ११७ वर्षाच्या इतिहासात अनेक थोर सारस्वतांनी आणि साहित्यप्रेमींनी वाङ्मय सेवकांची भूमिका पार पाडत आपल्या आयुष्यातला बहुमोल वेळ देऊन या संस्थेला नावारूपाला आणले. त्यांच्या योगदानाचे कृतज्ञतेने स्मरण करण्यात परिषदेला धन्यता वाटते. मराठी भाषा, साहित्य, समीक्षा आणि संस्कृती यांच्या जतन आणि संवर्धनासाठी कार्यरत राहिलेल्या परिषदेचे महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीत मोलाचे योगदान आहे. साहित्य संस्थांनी कालानुरूप बदलले पाहिजे ही भूमिका समोर ठेवून परिषदेला साहित्याभिमुख आणि लोकाभिमुख करण्यासाठी परिषदेने आपल्या कार्यशैलीत बदल केला आहे. परंपरा आणि आधुनिकतेचा मिलाफ घडवित आज साहित्य परिषदेची वाटचाल सुरु आहे. जुन्यातले नवे आणि नव्यातले अगदी नवे स्वीकारत यापुढेही समाज मनाची स्पंदने ओळखून परिषद कार्यरत राहणार आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषद

# शिवजयंतीनिमित्त रविवारी रक्तदान शिबिराचे आयोजन

सुराज्य/सोलापूर



डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय यांच्या मार्फत शिवजयंती निमित्त रविवार १९ फेब्रुवारी रोजी डॉ. ए. पी. जी. अब्दुल कलाम एसी हॉल, डॉ.वै. स्मृ. शा. वै. महाविद्यालय, सोलापूर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.

तरी जिल्ह्यातील अधिकाधिक सजग नागरिकांनी या शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या आदेशानुसार या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, यासाठी समाजातील सर्व स्तरावरील सक्षम व्यक्तिंनी स्वतः रक्तदान करून व इतरांना रक्तदान करण्यास प्रवृत्त करावे व शिबिरास उत्तम प्रतिसाद द्यावा. शासकीय रुग्णालया मधील बॅलॅसेमिया, सिकलसेल ॲनेमिया, प्रसुतीच्या स्त्री रुग्ण, अपघातग्रस्त व इतर गरजू रुग्णांना रक्त व रक्ताचे घटक शासकीय रक्तकेंद्रामधून उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आपले योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**अकलूज :** शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूल शंकरनगर अकलूज येथेजागरूक पालक सदृढ बालक अभियानांतर्गत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. याप्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्र यशवंतनगर चे वैद्यकीय अधिकारी डॉ अमोल आवाड व त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते.तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक जितेंद्र माने देशमुख हे उपस्थित होते.प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता माता सरस्वती व सहकार महर्षि काकासाहेब व आक्कासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी उपस्थित सन्माननीय प्रमुख पाहुण्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व डॉक्टर्स व सहकाऱ्यांचा सन्मान प्रशालेचे मुख्याध्यापक जितेंद्र माने देशमुख यांनी केला.त्यानंतर मुख्याध्यापकांनी आपल्या मनोगतातून महाराष्ट्र शासन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या जागरुक पालक सुदृढ बालक या अभियानाची माहिती सांगितली.तसेच डॉ.अमोल आवाड सर यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांनी आपल्या आरोग्याची योग्य काळजी घेतली पाहिजे, आपल्या आरोग्याबाबत सर्वांनी जागरुक राहिले पाहिजे असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तमन्ना नाईकवाडी यांनी केले. कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.



## आदर्श माता, लेक रमाई पुरस्कारांचे वितरण

सुराज्य/सोलापूर

महामाता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या १२५ व्या ऐतिहासिक जयंतीचे औचित्य साधुन येथील प्रबोधन विचार मंच या संस्थेच्या वतीने यावर्षी प्रथमच माता रमाईचा यांचा आदर्श व प्रेरणा घेऊन ज्या मातांनी आपल्या मुलांना चांगले संस्कार,चांगले शिक्षण देऊन उच्च पदापर्यंत जाण्यासाठी घडविले अशा मातांचा आणि आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या रमाईच्या लेकींचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांच्या हस्ते उदघाटन झाले.

यावेळी रेल्वे बँकेचे वरिष्ठ महाप्रबंधक डी. एस.सावंत हे कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा व सत्र न्यायाधीश अशोक भैसारे, विस्फोटक विभागाचे मुख्य नियंत्रक एस.जी. कदम, माजी पोलीस आयुक्त तथा अशोक भालेराव, उद्योजस्क दयानंद सीतापराव आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. दिवंगत अरुणाताई रणदिवे व ज्येष्ठ पत्रकार बबन कांबळे यांना आदरांजली अर्पण करून या सोहळ्याची सुरवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डी.एस.सावंत यांनी यावेळी रमाईचे बाबासाहेबांच्या जीवनातील योगदान व सम्राटचे संपादक बबन कांबळे यांच्या पत्रकारितेतील योगदानाबद्दल भाष्य केले. यावेळी केंद्रीय शिक्षिका धम्मरक्षिता कांबळे, प्रा.अंजनाताई गायकवाड, प्रा.ज्योती वाघमारे यांनी प्रतिनिधिक स्वरूपात आपले विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. कीर्तिपाल गायकवाड तर आभार कुमार साखरे यांनी तर कुमार साखरे यांनी आभार मानले.

आदर्श सोहळयात रत्नामाई चिंचोलकर, लक्ष्मी कांबळे, कुंदा भैसारे, विद्या चव्हाण, जाई दावणे, नीला सिद्धगणेश, छाया उघडे, निर्मला कांबळे, आशा शिवशरण, शेवंता मोरे, रत्नमाला माने व सुनंदा शाक्य यांचा आदर्श माता तर रजनी भडकुंबे, साधना गायकवाड, धम्मरक्षिता कांबळे, प्रा.अंजनाताई गायकवाड, प्रा.ज्योती वाघमारे, वैशाली उबाळे, राजश्री गायकवाड, मानसी सलवदे व डॉ.बुद्धकीर्ती आठवले यांचा रमाईची लेक म्हणून पंचशील उपरणे, सन्मानपत्र सन्मानचिन्ह,व पुष्प गुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रस्ताविक मुख्य संयोजक विश्वास गायकवाड केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दिपक बनसोडे, ऋषिकेश माळशिकारे, देविदास चिंचोलकर, सचिन शिंदे, लहू काळे, नारायण दुपारगुडे व बापू चाबूकश्वर या मंचच्या सदस्याने परिश्रम घेतले.

## टेंभुर्णीत मोटारसायकल रॅली काढून महाशिवरात्रीचा कार्यक्रम

सुराज्य/टेंभूर्णी

महाशिवरात्रीच्या निमित्ताने प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय शाखा टेंभुर्णी चे वतीने शनिवार दि. १८ फेब्रुवारी रोजी कुर्डुवाडी रोडवरील सेवा केंद्रावर सकाळी ८ वाजता आमदार संजय शिंदे यांचे हस्ते शिव ध्वजारोहण कार्यक्रम पार पडणार आहे.



यावेळी संजय बाबा कोकाटे, माढा लोकसभा मतदारसंघाचे संपर्कप्रमुख, सोलापूर जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजीतसिंह शिंदे, माढा तालुका पंचायत समिती माजी सभापती प्रतिनिधी बंडू नाना ढवळे, विठ्ठल गंगा शेती उत्पादक कंपनीचे धनराज शिंदे, भाजपचे तालुका अध्यक्ष योगेशजी बोबडे, तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष रावसाहेब देशमुख, माढा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष ऋषिकेश बोबडे, युवा उद्योजक सुरज देशमुख, शिवसेना तालुका प्रमुख मधुकर देशमुख, माढा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस युवक अध्यक्ष संभाजी पाटील, टेंभुर्णीचे सरपंच प्रमोद कुटे, उपसरपंच धनंजय गोंदील रोटरी क्लबचे अध्यक्ष संदीप जाधव, कॅन्सर फौंडेशनचे योगेश भनगे, तंटामुक्ति अध्यक्ष नागाभाऊ खटके, नागेश खटके, चव्हाणवाडी चे सरपंच नवनाथ शिंदे तसेच टेंभुर्णी प्रेस क्लबचे अध्यक्ष डि एस गायकवाड यांच्या सह टेंभुर्णी व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर महिला व पुरुष मंडळी बहुसंख्येने उपस्थित राहणार आहेत.

याचवेळी सकाळी ९ वाजता ओम शांती कॉलनी टेंभुर्णी येथून शहरातील प्रमुख रस्त्यावरून मोटार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. याचा उद्देश सर्व धर्माआत्म्यांचा, परमात्मा- ईश्वर एकच आहे हा संदेश सर्वांना कळवा असा आहे.ही माहिती टेंभुर्णी सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी अनिता बहेणजी यांनी दिली.

# खोट्या जातीच्या दाखल्याच्या विरोधात अकलूजमध्ये जनआक्रोश

सुराज्य/अकलूज

**अनुसूचीत जाती- जमाती बचाव समीती, माळशिरस तालुका व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने अकलूज येथील प्रांत कार्यालयावर खोट्या जातीच्या दाखल्याविरोधात जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला यामध्ये बहुसंख्येने बहुजन समाज बांधव सहभागी झाले होते. या आंदोलनाची सुरुवात विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या बस स्थानकाजवळील पुतळ्याला अभिवादन करून झाली.**





यावेळी प्रांत कार्यालय येथे मोर्चा गेल्यानंतर त्या ठिकाणी अनेक जणांनी या विषयावर आपल्या भावना व्यक्त केल्या यावेळी प्रांताधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,वेळापूर ता माळशिरस येथील जीवन उत्तमराव जानकर व ज्योती उत्तमराव जानकर यांनी सोलापूर येथील जात पडताळणी समिती यांच्या कोर्टात त्यांची मूळ जात हिंदू धनगर असताना बेकायदेशीर बनावट कागदपत्रे काढून जिल्हा जात पडताळणी समितीकडे राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील लाभ उठवण्यासाठी अनुसूचित जातीच्या प्रमाणपत्राची मागणी केली आहे. सदर प्रकरण सोलापूर येथील जात पडताळणी समिती कोर्टात प्रलंबित आहे. सदरचा प्रकार हा अनुसूचित जातीवर अन्यायकारक आहे. उत्तम जानकर हे माळशिरस तालुक्यातील धनगर या जातीच्या प्रवर्गातील आहेत परंतु त्यांनी सुद्धा माळशिरस तालुक्यातील अधिकारी वर्गाच्या डोळ्यात धुळफेक करून हिंदू खाटीक असा दाखला काढून माळशिरस तालुक्याची आमदारकी लढवली आहे.

अनुसूचित जातीत येऊन राजकीय व इतर सर्व फायदे उठवण्याचे कटकारस्थान चालू आहे. माळशिरस तालुक्यातीलच नव्हे तर तमाम महाराष्ट्रातील मागासवर्गीय लोकांच्या मध्ये यामुळे अस्वस्थता निर्माण झाली आहे. सदर घटना अनुसूचित जातीच्या जमातींच्या लोकांना धोकादायक स्थितीत घेऊन जाणारी आहे .तसेच संविधानाच्या विरोधात असून भविष्यात धनगर समाज व दलित समाजात तेढ निर्माण करणारी आहे तरी या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी व बनावट कागदपत्राच्या आधारे त्यांना हिंदू खाटीक प्रमाणपत्र देण्यात येऊ नये अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच माळशिरस तालुक्यातील अनुसूचित जाती जमाती च्या सर्व जातींना शासकीय समितीत सदस्य करुन घ्यावे. माळशिरस तालुक्यातील बेघरांना घरकुलसाठी जागा उपलब्ध करून द्यावी.

**तो खटला सध्या न्यायालयीन प्रलंबित असताना त्यांचे पुत्र जीवन व ज्योती जानकर यांनीही राजकीय, शैक्षणिक लाभ मिळवण्यासाठी खोटी कागदपत्रे सादर करून हिंदू खाटीक या जात पडताळणी प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सदरची मागणी पूर्णपणे चुकीची असून आधीच अनुसूचित जाती जमातींच्या लोकांमध्ये प्रचंड बेरोजगारी गरीबी असताना सध्या ते जगण्यासाठी सक्षम नाहीत. त्यांच्या हक्काच्या असणाऱ्या जागेवर जानकर कुटुंबातील लोकांकडून अतिक्रमण करण्याचे काम सध्या माळशिरस तालुक्यात चालू आहे.**


जीवन जानकर व ज्योती जानकर यांना बनावट कागदपत्रांच्या आधारे जात प्रमाण पत्र देणारे तत्कालीन तहसीलदार यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी.जानकर कुटुंबातील सदस्य लोकांनी बनावट जात दाखल्या आधारे कोणकोणत्या शासकीय योजनेचा लाभ घेतला आहे याची चौकशी करावी अन्यथा जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या कार्यालयावर मोर्चा काढणार असल्याचेही सदर निवेदनात म्हटले आहे. यावेळी खोट्या जातीच्या दाखल्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. सदर मोर्चा मध्ये बहुसंख्येने बहुजन बांधव सहभागी झालेले दिसले.

# एसटी बस नसल्याने दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्रवासी त्रस्त

## अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्यांना महामंडळाचा छुपा आशीर्वाद

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर

**दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतकरी, नागरिक, विद्यार्थी यांना ये जा करण्यासाठी एसटीशिवाय पर्याय नाही. परंतु राज्य परिवहन मंडळाच्या मनमानी कारभारामुळे अनेकांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. बस सेवा कमी झाल्याने अवैध वाहतूक करणाऱ्यांची चंगळ झाली आहे.**




एसटी वेळेवर धावत नसल्याने सवलतीधारक जेष्ठ नागरिक आणि पासधारक विद्यार्थी बेजार झाले आहेत. याकडे एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून दक्षिण सोलापूर तालुक्यातील सर्वच गावांमध्ये जाणाऱ्या एसटी गाड्या वेळेवर सोडण्यासाठी संबंधित यंत्रणेला आदेश द्यावेत, अशी मागणी दक्षिण सोलापूर तालुक्यातील ग्रामस्थांमधून होत आहे.

येथील शेकडो विद्यार्थी निंबर्गी, मंद्रूप, कुडल संगम, टाकळी, औज(मंद्रूप), कारकल, लवंगी, बाळगी, सिंदखेड, आहेरवाडी, मद्रे, औराद, वडापूर, होनमुर्गी, राजुर, वडापूर, कंदलगाव, गुंजेगाव, आणि सोलापूर येथील विविध शाळा महाविद्यालयात शिकण्यासाठी येत आहेत. यातील बहुतांश विद्यार्थी हे शिक्षणासाठी एसटी बसने ये जा करतात. विद्यार्थीनी देखील रोज शाळा महाविद्यालयाला ये जा करतात. शाळा महाविद्यालय सुटल्यानंतर एसटी बस वेळेवर येत नसल्याने त्याची वाट पाहत बसस्थानक, सात रस्ता, नेहरूनगर आणि सैफुल या सोलापूरातील तर मंद्रुप, निंबर्गी येथील स्थानकावर बसतात. अवेळी येणाऱ्या एसटीची वाट पाहत तासनतास ताटकळत बसावे लागते.

विद्यार्थी आणि जेष्ठ नागरिक यांचा विचार करून परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष घालून दक्षिण सोलापूर तालुक्यातील सर्व मार्गावर वेळेवर एसटी बस सोडाव्यात, अशी मागणी केली जात आहे.

### एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन दिले

भंडारकवठे गावातून रोज विद्यार्थी सोलापूरसह अन्य गावाला शिक्षणासाठी जात असतात. विद्यार्थी हे सवलतीतून प्रवास करण्यासाठी पास काढलेले असतात. आणि ज्येष्ठ नागरिक यांना सवलत मिळते. मात्र अवेळी येणाऱ्या एसटी बसचा फटका बसतो आहे. यामुळे यांना त्रास होत असून लवकरच एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. आपण दिलेल्या अर्जाचा विचार करून बस सेवा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले आहे.

**–चिदानंद कोटगोंडे, सरपंच भंडारकवठे**

### विद्यार्थ्यांसाठी आंदोलन करू

भंडारकवठे गावातून रोज विद्यार्थी सोलापूरसह अन्य गावाला शिक्षणासाठी जात असतात. विद्यार्थी हे सवलतीतून प्रवास करण्यासाठी पास काढलेले असतात. आणि जेष्ठ नागरिक यांना सवलत मिळते. मात्र अवेळी येणाऱ्या एसटी बसचा फटका बसतो आहे. यामुळे यांना त्रास होत असून लवकरच एसटी महामंडळाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. आपण दिलेल्या अर्जाचा विचार करून बस सेवा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले आहे.

**–विवेकानंद कमळे, सामाजिक कार्यकर्ते भंडारकवठे**



## इंडियन मॉडेल स्कूलचे स्नेहसंमेलन साजरे

✔ **अक्कलकोट** : अक्कलकोट इंडियन मॉडेल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी विविध कलागुण अविष्कार सादर करण्यात आले. आपल्या पाल्याचे कलागुण पाहण्यासाठी अक्कलकोट परिसरातील पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोन तास चाललेल्या या कार्यक्रमात लहान गटापासून ते आठवी पर्यंतच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत पावनखिंड येथील घटना, लख्ख पडला प्रकाश, देशभक्तीपर गीत, सिनेमातील गाणे, राजस्थानी गाणे अशी विविध गाणी सादर केली. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे माजी गृहराज्यमंत्री व मातोश्री लक्ष्मीबाई म्हेत्रे प्रतिष्ठान संचलित इंडियन मॉडेल स्कूलचे अध्यक्ष मा. सिध्दाराम म्हेत्रे साहेब, प्रमुख पाहुणे तहसीलदार बाळासाहेब शिरसाट, मा. गटविकास अधिकारी सचिन खुडे, उपाध्यक्ष मा. अमोल जोशी सर, सायली जोशी, अम्मा सुवर्णलक्ष्मी फाउंडेशनचे अध्यक्ष मा. लक्ष्मीताई म्हेत्रे, संस्थेचे खजिनदार मा. शीतलताई म्हेत्रे, प्राचार्य डॉ. गणपती वाघमोडे, ममता बसवंती, मुख्याध्यापिका गौरी दातार तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व पालक वर्ग उपस्थित होते.



## ताराराणी कुस्ती केंद्राला राज्यस्तरीय स्पर्धेत ४ पदके

✔ **अकलूज** : माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, आ.रणजितसिंह मोहिते-पाटील, धैर्यशिल मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनपर व शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या व्यवस्थापन अंतर्गत चालणाऱ्या शिवरत्न शिक्षण संस्था संचलित ताराराणी महीला कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील ४ खेळाडूंची राज्यस्तरीय कुस्ती पदके मिळाली आहेत. खोपोली, रायगड येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शालेय मुलींच्या कुस्ती स्पर्धेत १४ वर्ष वयोगटात वैष्णवी तोरवे ४२ किलो सुवर्णपदक,१७ वर्ष वयोगटात वेदिका शेंडे ४० किलो, कास्यपदक आकांक्षा जाधव ४६ किलो रोप्य पदक, स्नेहल पालवे ७५ किलो कांस्यपदक ताराराणीच्या या ४ खेळाडूंची राज्यस्तरीय कुस्ती पदके मिळवल्याबद्दल खेळाडू व प्रशिक्षक सतपाल सर यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## लायन्स प्रांताच्यावतीने विविध मान्यवरांचा सन्मान

✔ **अक्कलकोट** : लायन्स प्रांत ३२३४ डी१ ची तृतीय कॅबिनेट मीटिंग डिस्ट्रिक्ट गव्हर्नर राजशेखर कापसे यांच्या नेतृत्त्वाखाली कराड येथे उत्तमरीतीने संप्पन झाली. महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व विद्यमान आमदार पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते आज पर्यंत लायन्स प्रांतामध्ये दिलेल्या योगदानाबद्दल माजी प्रांतपाल ला बाबासाहेब पवार, डॉ.विलास शहा, अण्णासाहेब गळतगे, प्रभाकर अंबेकर, अशोक मेहता, डॉ.व्यंकटेश यजुर्वेदी, सुभाष आरवाडे, पांडुरंग शिंदे, विजय राठी, जगदीश पुरोहित, जितेंद्र दोशी, सुनील सुतार या सर्व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला करण्यात आला. माजी मुख्यमंत्री पृथवीराज चव्हाण यांनी लायन्स क्लब समाज्यामध्ये देत असलेल्या सेवा कार्याचा गौरव करून, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर राजशेखर कापसे व सर्व माजी प्रांतपाल यांनी आजपर्यंत केलेल्या कार्याचे कौतुक करून, त्यांचे अभिनंदन केले.अश्या अनेक ठिकाण आहेत जेथे सरकार पोहचत नाही, त्याठिकाणी लायन्स क्लब सेवा देत आहे असे माजी मुख्यमंत्री चव्हाण यांनी बोलताना सांगितले. यावेळी व्यासपीठावर डिस्ट्रिक्ट गव्हर्नर राजशेखर कापसे, उपप्रांतपाल मल्लिनाथ पाटील, माजी प्रांतपाल सुनील सुतार, प्रांताच्या प्रथम महिला वैशाली कापसे, प्रांतीय सचिव सुभाष गडसिंग, प्रांतीय खजिनदार मल्लिकार्जून मसुती,अशोक भांजे, हे उपस्थित होते. या कार्यक्रमाला वीरेंद्र चिखले, महेश खुस्पे, राजेंद्र शहा कासवा,दिनकर पतंगे, राजेंद्र वडगुळे, राहुल दोशी, सर्जेराव पाटील, डॉ अभिजित जोशी, लक्ष्मण यादव, शदिद वळसंगकर, राजेंद्र हत्ते, गौरीशंकर चनशेट्टी, शिरीष पंडित, शिवपुत्र हळगोदे व अनेक कॅबिनेट ऑफिसर उपस्थित होते.



## रिपाइंच्या निवेदनानंतर झाली तांबवे ग्रामपंचायतीची ग्रामसभा

✔ सुराज्य/श्रीपूर

अखेर रिपब्लिकन पक्षाच्या निवेदनाची दखल घेत तांबवे ग्रामपंचायतची ग्रामसभा दि १५ फेब्रुवारी २०२३ रोजी संपन्न झाली.

दि २६ जानेवारी रोजी झालेली ग्रामसभा संबंधित विभागाचे अधिकारी गैरहजर होते तसेच ग्रामस्थांची उपस्थिती कमी होती. त्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका यांच्या वतीने पंचायत समिती माळशिरस यांना निवेदन देऊन ग्रामसभा पुन्हा घेण्यात यावी अन्यथा आंदोलन करू अशी मागणी करण्यात आली होती.

यावेळी गावातील विविध विकास कामांच्या प्रश्नावर चर्चा करण्यात आली. तसेच दारूबंदी, गावातील अंतर्गत रोड, गटारी , शासनाच्या विविध योजनांची माहिती, अटल भूजल योजना , यांची ग्रामस्थांना माहिती देण्यात आली. यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक ,सदस्य , रिपाई युवक तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे ,तालुका उपाध्यक्ष संतोष कांबळे ,सतीश गायकवाड उपस्थित होते.

## मिरवणुकीत आवाजाच्या मर्यादा पाळा : पाटील

✔ सुराज्य/सांगोला

शिवजयंती साजरी करत असताना सर्वांनी नियमांचे पालन करावे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराचा वारसा पुढे चालविण्यासाठी कोणत्याही जाती धर्माचा अपमान होणार नाही यासाठी सर्वांनी काळजी घ्या मिरवणुकित आवाजाच्या मर्यादा पाळा आजारी रुग्णांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या शिवजयंती उत्सव सोहळा शांततेत आणि चांगल्या पद्धतीने साजरा करूया असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील यांनी केले.

१९ फेब्रुवारी रोजी सांगोला शहरात साजरा होणाऱ्या शिवजयंती निमित्त सांगोला तालुका शांतता कमिटीची बैठक पार पडली त्यावेळी त्या बोलत होत्या.

या बैठकीला तहसीलदार अभिजीत पाटील मुख्याधिकारी डॉक्टर सुधीर गवळी पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी वीज वितरणचे अभियंता आनंद पवार सहाय्यक पोलीस निरीक्षक नागेश यमगर आदीसह बाबुराव गायकवाड सुभाष इंगोले डॉक्टर पियुष पाटील अरविंद केदार योगेश खटकाळे प्राध्यापक संजय देशमुख कमरुद्दीन खतीब बापूसाहेब भाकरे प्रताप इंगोले किशोर बनसोडे गुंडा खटकाळे महेश नलावडे रवींद्र कांबळे आदीसह शिवप्रेमी व मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बार्टी आरटीईचे फॉर्म मोफत भरून देणार

✔ **उत्तर सोलापूर** : शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या परिपत्रकनुसार आर्थिक दुर्बल व वंचित इतर विद्यार्थ्यांचे बारटीचे समतादुत मोफत फॉर्म भरून देणार असल्याचे प्रकल्प समन्वयक प्रणिता कांबळे ह्यांनी सांगितले आहे. सक्तीच्या शिक्षनाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार खाजगी विनाअनुदानित शाळामध्ये पहिलीत प्रवेश देण्याऱ्या दुर्बल व वंचीत घटकातील विद्यार्थी साठी फेबूवारी पासून आर टी ई प्रवेशचे ऑनलाईन फ्रॉम भरणे सुरु आहेत. शेंक्षणिक सत्र २०२३-२४ या कालावधीसाठी बार्टीचे समतादूत हे आर टी ई फ्रॉम मोफत डॉ. बाबासाहेब आबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे जिल्हा सोलापूर समतादूत आर टी ई ऑनलाईन फ्रॉम विनामूल्य भरून देणार आहेत. इच्छुकांनी बार्टी कार्यालय सात रस्ता सोलापूर. आपल्या पाल्यचा जन्मचा दाखला, वडिलांचा जातीचा दाखला, उत्पनाचे प्रमाणपत्र, राहिवाशी प्रमाणपत्र आदी कागदापत्र घेवून सम्पर्क साधावे.

## यशस्वी महिला मंचच्या वतीने टेंभुर्णीत महाराजस्व अभियान

✔ सुराज्य/टेंभुर्णी



शुक्रवार दि. १७ फेब्रुवारी रोजी लोकनेते कृष्णात दादा बोबडे यांच्या स्मरणार्थ यशस्विनी महिला मंचच्या वतीने शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत महाराजस्व अभियानचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर करमाळा रोड, टेंभुर्णी येथील सनराइज् इंग्लिश मीडियम स्कूल शाळेमध्ये सकाळी ८.०० पासून सायं ६.०० पर्यंत आयोजित करण्यात आलेले असून यामध्ये ज्या लोकांचे नवीन मतदान कार्ड नोंदणी, नवीन आधार कार्ड नोंदणी, नवीन रेशन कार्ड किंवा विभक्त रेशन कार्ड, श्रावण बाळ योजना प्रकरण तयार करणे, हेल्थ कार्ड काढणे, दुबार रेशन कार्ड काढणे, संजय गांधी निराधार योजना प्रकरण करणे, ई-श्रम कार्ड काढणे, रेशन कार्ड मध्ये नवीन नाव वाढवणे, आयुष्यमान भारत कार्ड काढणे तसेच महत्त्वाचे म्हणजे ज्या लोकांकडे रेशन कार्ड आहे परंतु त्यांना रेशनचा माल मिळत नाही त्यांना या योजनेचा लाभ घेता येईल व त्यानंतर मान मिळण्याची व्यवस्था केली जाईल. तसेच रेशन कार्ड हरवल्यानंतर पोलीस स्टेशनचा गहाळ झालेला दाखला घ्यावा लागतो त्याचीही व्यवस्था या शिबिरात करण्यात आलेली आहे. तलाठी कार्यालय, माढा तहसील कार्यालय या ठिकाणी हेलपाटे मारून देखील ज्यांची कामे लवकर होत नाहीत त्या सर्वांसाठी दिनांक १७रोजी एकाच ठिकाणी सर्व सुविधा मिळण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे टेंभुर्णी शहरातील नागरिकांना वरील सर्व सेवा एकाच ठिकाणी आणि एकाच दिवसात मिळतील त्यामुळे वरील योजनांचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आलेले आहे.

## चिखली येथे हनुमान मंदिरात लक्ष्मण शक्तीचा कार्यक्रम

### भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन

✔ सुराज्य/चिखली

मोहोळ तालुक्यातील मौजे चिखली येथील रामटेकडी हनुमान मंदिरात भावार्थ रामायणातील लक्ष्मण शक्तिचा कार्यक्रम होणार आहे तरी भाविक भक्तांनी धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन चिखली ग्रामस्थ यांनी केले आहे.

मोहोळ तालुक्यातील सोलापूर - पुणे हायवे रोडवरील चिखली पाटीपासून १ किलोमीटर उत्तरे कडील बाजूला असणाऱ्या रामटेकडी हनुमान मंदिर (माळी वस्ती) येथील हनुमान मंदीरात भावार्थ रामायणातील लक्ष्मण शक्तिचा कार्यक्रम होणार आहे. मित्ती माघ कृ १३ शके १९४४ शनिवार दि. १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाचून ३० मिनिटांनी श्रीपुजा व ग्रंथातील अध्याय वाचण्यास प्रारंभ होणार असून दि. १९ रोजी सकाळी ७.३० मिनिटांनी आरती होईल.त्यानंतर ह.भ.प. तुकाराम (महाराज) ननवरे यांच्या उपस्थितीत ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. तरी संपूर्ण परिसरातील सर्व वाचक, सुचक, रामभक्तांनी कार्यक्रमास उपस्थिती लावून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त चिखली गावकरी मंडळी व भक्त मंडळींच्या वतीने करण्यात आले आहे.

## सुस्ते येथे अंगणवाडीचे कुलूप तोडून नुकसान

✔ **पंढरपूर** : बंद असलेल्या शासकीय अंगणवाडी शाळेचे कुलूप तोडून दरवाजाचे नुकसान केल्याची घटना सुस्ते (ता.पंढरपूर) येथील भीम नगरात सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी चौघांविरुद्ध सार्वजनिक संपत्ती नुकसान अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल केला. यासंदर्भात महिला ग्रामसेवक ज्योती सर्जे राव पाटील यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी विशाल उर्फ भैय्या फडतरे, विकास बंगाळे, गणेश फडतरे आणि बालाजी गायकवाड (सर्व रा. सुस्ते ता.पंढरपूर) या चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## टेंभुर्णीमधील सभागृहाचे महाशिवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर होणार लोकार्पण

✔ सुराज्य/टेंभुर्णी

टेंभुर्णी मधील श्री बृहनमठ वेळापूर या वास्तूचा आमदार फंडा मधून जीर्णोद्धार करण्यात आला.१३ लाख रुपये मंजूर करण्यात आले. आमदार फंडा मधून वास्तू चा जिर्णोद्धार करण्यात आला. याचा टिळक रोड येथील रहिवासीयांना उपयोग होणार आहे. दिनांक १८ रोजी महाशिवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर बबनराव शिंदे यांचे हस्ते लोकार्पण करण्यात येणार आहे.

यावेळी बृहनमठ वेळापूर श्री गुरू शिरोमणी मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामी व श्री गुरु शिवराज शर्मा यांचे प्रमुख उपस्थित पार पडणार आहे.

यावेळी जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे श्री श्री कारखान्या चे चेअरमन एन.शेषगिरीराव,सरपंच प्रमोद कुटे, शिवाजीराव पाटील, चांदजकर, तुकाराम ऊर्फ बंडू नाना ढवळे. भाजपचे तालुकाध्यक्ष योगेश बोबडे शिवसेनेचे तालुकाप्रमुख मधुकर देशमुख राष्ट्रवादी




काँग्रेसचे तालुका अध्यक्ष कैलास तोडकरी व रमेश पाटील हे उपस्थित राहणार आहेत. आमदार शिंदे हस्ते भूमिपूजन करण्यात आले. त्यावेळेस सदर वास्तू साठी १००% मदत करण्याचे आश्वासन दिले होते. सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन बृहनमठ वेळापूर शाखा टेंभुर्णी यांनी केले आहे.

सुराज्य सोलापूर Classified

**नोकरी विषयक**

शेतात वस्तीवर राहून नर्सरी व गायींचे काम करणारे जोडपे पाहिजे. पगार १७००० महिना. दोन लाख वर्षाला. ९९२२००४२४२ गिरमे अकलूज.(१४०३२३)

**विवाह विषयक**

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर
संपर्क : **9763624364, 7410553871** (040323)

### ▶▶ शंकरनगर येथील महाशिवरात्र यात्रेचे उद्घाटन

# कृषी व औद्योगिक प्रदर्शनाबरोबरच कुस्त्यांचा आखाडाही सज्ज

✔ सुराज्य/अकलूज

शंकरनगर येथील शिवपार्वती मंदिरात जवळ महाशिवरात्री यात्रेनिमित्त महाशिवरात्र यात्रा महोत्सव समिती चारिटेबल ट्रस्ट शंकरनगर यांनी आयोजित केलेल्या महाशिवरात्र यात्रेचे उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व यात्रा समितीचे कार्याध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते व माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रकाश पाटील, माजी व्हाईस चेअरमन रामचंद्र सावंत पाटील, यात्रा समितीचे जनरल सचिव राजेंद्र चौगुले, शिवामृत दूध संघाचे उपाध्यक्ष दत्तात्रय भिलारे, कारखान्याचे संचालक तथा कुस्ती विभागाचे प्रमुख रावसाहेब मगर, संचालक महादेव घाडगे, लक्ष्मण शिंदे, शंकरराव माने देशमुख, भारत फुले, नाना काळे, रावसाहेब पराडे, तात्या आसबे, सतीश शेंडगे, विठ्ठलराव ताटे, मोहनराव लोंढे, धनंजय चव्हाण, भगवान मिसाळ यांच्यासह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.



दिनांक १५ ते १९ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या महाशिवरात्र यात्रेमध्ये दिनांक १८ रोजी महाशिवरात्रीनिमित्त पहाटे शिवपार्वती मंदिरामध्ये शिवामृत दूध उत्पादक संघाचे चेअरमन धैर्यशील मोहिते-पाटील व त्यांच्या पत्नी शितलदेवी मोहिते पाटील यांचे हस्ते महा अभिषेक होणार आहे. तसेच यात्रेनिमित्त कृषी औद्योगिक प्रदर्शन पिक स्पर्धा यांचे आयोजन केले आहे. दिनांक १९ रोजी कर्मवीर कै.बाबासाहेब माने-पाटील, सहकार महर्षी कै शंकराव मोहिते पाटील व धर्मवीर कै सदाशिवराव माने पाटील यांच्या स्मृतिप्रित्यर्थ माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते व यात्रा समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांचे उपस्थितीत शिवतीर्थ आखाड्यावर जंगी कुस्त्यांचे मैदान व अखिल भारतीय त्रिमूर्ती केसरी वजन गट कुस्ती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

कोरोनाचा संसर्ग व लॉकडाऊन मुळे गेली दोन वर्ष यात्रा मोठ्या प्रमाणावर भरली नव्हती तर यावर्षी जनावरांच्या लंपी आजारामुळे जनावरांचा बाजार भरणार नसल्याचे यात्रा समितीच्यावतीने सांगण्यात आले. यात्रा समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रेमध्ये २४ तास वीज पाणी व करमणुकीच्या कार्यक्रमा चे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती यावेळी यात्रा समितीचे जनरल सेक्रेटरी राजेंद्र चौगुले यांनी यावेळी दिली.

# सहाय्यक आयुक्तांना चोपले; आव्हाडांसह ७ जणांवर गुन्हा

✔ सुराज्य/ठाणे

**ठाणे महानगर पालिकेचे अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त महेश आहेर यांना राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्या कुटुंबियांना मारण्याचा कट रचल्याचा आरोप करत राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी तथा आव्हाड समर्थकांनी महापालिका मुख्यालयात गेटवर मारहाण केली होती. या प्रकरणी महेश आहेर यांनी पोलीस ठाण्यात धाव घेऊन आव्हाड यांच्यासह त्यांच्या सात कार्यकर्त्यांवर प्राणघातक हल्ला केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या चार जणांना ताब्यात घेतले आहे. पुढील कारवाई सुरू आहे. तर दुसरीकडे आव्हाड यांची पत्नी ऋता आव्हाड आणि मुलगी नताशा आव्हाड यांनी महेश आहेर यांच्या नावे असलेल्या ऑडिओ क्लिपच्या सहाय्याने आपल्या जीविताला धोका असल्याचा गुन्हा नोंदवला आहे.**



राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्या कुटुंबीयांना मारण्याचा कट रचला जात असल्याची खळबळजनक ऑडिओ क्लिप समोर आली आहे. ही क्लिप ठाणे महानगर पालिकेचे अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त महेश आहे यांची असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकत्यांनी महेश आहेर यांना पालिका मुख्यालयात गेटवर लाथाबुक्क्यांनी चोप दिला.

या प्रकरणी महेश आहेर यांना मुका मार लागला असून त्यांच्यावर ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयात उपचार सुरू आहे. या प्रकरणी महेश आहेर यांनी ठाण्यातील नौपाडा पोलीस ठाण्यात आपल्यावर झालेल्या हल्ल्याची तक्रार नोंदवली आहे. आहेर यांनी आपल्यावर झालेला हल्ला हा प्राणघातक असून यावेळी सांगितले की, आपण आव्हाड यांच्या मतदार संघात केलेल्या बेकायदेशीर बांधकाम तोडल्या प्रकरणी मनात राग धरून आव्हाड यांच्या सांगण्यावरून जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने बंदूक आणि चॉपरच्या सहाय्याने वार करण्याच्या हेतूने हल्ला केला असल्याचं तक्रारीत नमूद केलं आहे. हा हल्ला केला असून या प्रकरणी जितेंद्र आव्हाड यांच्यासह त्यांचे पीए अभिजित पवार, हेमंत वाणी, विक्रम खामकर व इतर ३ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इतर तीन जणांनी आहेर यांच्यावर बंदूक आणि चॉपरच्या सहाय्याने जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला. परंतु सुरक्षारक्षक आलेले पाहून या तिघांनी पळ काढला आणि जाता जाता तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिल्याचे देखील आहेर यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे.

धक्कादायक ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी महेश आहेर यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीचा संपूर्ण प्रकार हा मोबाईल कॅमेरामध्ये कैद झाला आहे.

मारहाणीची तक्रार नमूद झाल्यानंतर नौपाडा पोलिसांनी तपासला सुरुवात करून राष्ट्रवादी काँग्रेसच्या चार कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. या प्रकरणी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास नौपाडा पोलीस करत आहेत.

### महेश आहेर यांची कथित ऑडिओ क्लीप व्हायरल

तर दुसरीकडे जितेंद्र आव्हाड यांच्या मुलीला आणि जावयाला दुखापत पोहचवण्यासाठी कट रचला असल्याची धक्कादायक ऑडिओ क्लिप समोर आली आहे. या क्लिप मधील व्यक्तीचा आवाज हा महेश आहेर यांचाच असल्याचा दावा जितेंद्र आव्हाड यांच्या पत्नी ऋता आव्हाड यांनी केला आहे. उपमुख्यमंत्र्यांनी निश्चितच चौकशी करावी, परंतु हा आवाज महेश आहेर यांचाच आहे यात दुमत नसल्याचे ऋता आव्हाड म्हणाल्या. इतक्या खालच्या थराला जाऊ एखाद्या बद्दल इतकं वाईट बोलायचं. पैशाच्या जमिनीच्या व्यवहाराबद्दल बोललं आहे. एवढे सगळे पुरावे या क्लिपच्या माध्यमातून समोर आले आहेत. त्यामुळे आता पोलीस आणि प्रशासन यावर त्यांच्यावर काय कारवाई करणार, असा प्रश्न ऋता आव्हाड यांनी उपस्थित केला आहे. या घटनेवरून मला दुःख होत नसून आश्चर्य वाटत आहे. जर आता या प्रकरणी पोलिसांनी कुठल्याही प्रकारची कारवाई केली नाही तर न्यायालयीन कारवाई लढणार असल्याचे ऋता आव्हाड यांनी सांगितले.

हे कृत्य महेश आहेर यांचा नीचपणा आहेत. यासाठी मुख्यमंत्र्यांना देखील ऋता आव्हाड यांनी विनंती केली आहे की, 'महेश आहेर हे मुख्यमंत्र्यांच्या नावाने देखील लोकांना धमक्या देत असतात आणि तशा तक्रारी लोक आमच्याकडे देत असतात. थोडी तरी जनची नाही तर मनाची लाज असेल तर या क्लिपिंगवर कारवाई करावे, अशी मागणी देखील ऋता आव्हाड यांनी केली आहे. ऑडिओ क्लिपच्या माध्यमातून आव्हाड यांची मुलगी आणि जावयाला मारण्याचा कट रचला असल्याची धक्कादायक क्लिप समोर आल्यानंतर जितेंद्र आव्हाड यांच्या पत्नी ऋता आव्हाड आणि मुलगी नताशा आव्हाड यांनी ठाण्यातील वर्तकनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून या प्रकरणी लवकरात लवकर कारवाई कारवाई अन्यथा आणि न्यायालयाचे दरवाजे ठोकणार असल्याचा इशारा ऋता आव्हाड यांनी दिला आहे. वर्तकनगर पोलिसांनी तक्रार नोंद करून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपासाला सुरुवात केली आहे.



# वीजबिलांची थकबाकी ७३ हजार कोटींवर

### शेतीपंपधारकांनी पंधरा वर्षे भरली नाहीत बिले

✔ सुराज्य/पुणे

'महावितरण'च्या वीजग्राहकांच्या बिलांची थकबाकी तब्बल ७३ हजार ३६१ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. यामध्ये सवलतीच्या दरात वीजपुरवठा घेणाऱ्या १५ लाख १९ हजार शेतीपंपधारक ग्राहकांनी मागील पाच वर्षांपासून एकदाही वीजबिल भरलेले नसून, त्यांच्याकडे २१ हजार ६७ कोटी रुपयांच्या थकबाकीचा समावेश आहे, तर तीन लाख २३ हजार शेतीपंपधारकांनी गेल्या पंधरा वर्षांहून अधिक काळ एकही वीजबिलाचा भरणा केला नसून, त्यांच्याकडे ५ हजार २१६ कोटी रुपये थकित आहेत.

'महावितरण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी ही माहिती दिली. घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक व शेतीपंपधारक ग्राहकांनी अखंडित वीजपुरवठा सुरू ठेवण्यासाठी वीजबिले भरून सहकार्य करावे,' असे आवाहन त्यांनी केले आहे.

# 'मुच्छड पानवाला'वर पोलिसांची धाड

### सापडले मोठे घबाड

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**मुंबईतील लोकप्रिय मुच्छड पानवाला यांच्या पानाच्या दुकानावर अंमली पदार्थ विरोधी पथकाने (अँटी नारकोटिक सेल) छापेमारी केली आहे. खेतवाडी येथे असलेल्या दुकानात ही छापेमारी करण्यात आला असून दुकानातील गोदामातून जवळपास १४ लाखांचा माल जप्त करण्यात आला आहे. यात ई-सिगारेटचा समावेश आहे. पोलिसांनी शिवा पंडित उर्फ शिवकुमार तिवारी याला ताब्यात घेतलं असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे.**




मुच्छड पानवाला हे मुंबईतील प्रसिद्ध दुकान आहे. इथे निरनिराळ्या फ्लेव्हर्सची पान मिळतात. बॉलिवूड सेलिब्रिटींसह मोठ्या मोठ्या उद्योजकांनीही या दुकानाला भेट दिली आहे.

### मर्सिडिजमध्ये फिरतात दोघे भाऊ

१९७७ साली पंडित श्यामचरण तिवारी यांनी पानाची टपरी सुरू केली होती. त्यानंतर त्यांच्या दोन्ही मुलांनी त्यांना हातभार लावण्यास सुरुवात केली. आपल्या रुबाबदार मिशांमुळं तिवारी हे अल्पावधीतच स्थानिक लोकांमध्ये लोकप्रिय झाले. हळूहळू त्यांचा व्यवसायही तेजीत आला आणि त्यांचे ग्राहकही वाढू लागले. शिवकुमार तिवारी आणि जयशंकर तिवारी हे दोन भाऊ मिळून हे दुकान चालवतात. सहा-सहा महिन्यांसाठी ते दुकान सांभाळतात. दोन्ही भाऊ मर्सिडिज गाडीतून फिरतात. तर दक्षिण मुंबईतील करोडपतींच्या यादीत त्यांचे स्थान आहे.

मुंबईत ७०च्या दशकात सुरू झालेल्या या दुकानाची स्वतःची वेबसाइटदेखील आहे. तसंच, ऑनलाइन फूड ऑर्डिरिंग पोर्टल्सवरदेखील ऑर्डर घेतल्या जातात.

मुंबई क्राइम बँचच्या अँटी नारकोटिक्स सेलने ही कारवाई केली आहे. ई-सिगारेटच्यासंबंधित ही छापेमारी असून पोलिसांनी १५ लाखांचा माल जप्त केला आहे. एएनसीने पुढील तपास व्ही.पी रोड पोलिसांना सोपवला आहे.

दरम्यान, याआधीही एनसीबीने गांजाची तस्करी करण्याच्या आरोपाखाली मालक शिवकुमार तिवारी याला अटक केली होती.

# घायाळ वाघ अखेर मैदानात

✔ सुराज्य/पुणे



प्रकृती अस्वस्थ्यामुळे गेल्या काही दिवसांपासून राजकारणापासून दूर असलेले भाजपचे ज्येष्ठ नेते गिरीश बापट हे अखेर कसबा पोटनिवडणुकीच्या प्रचारात उतरणार आहेत.

दोन दिवसांपूर्वीच गिरीश बापट यांनी तब्येत ठीक नसल्याचे कारण देत कसबा पोटनिवडणुकीच्या प्रचारात प्रत्यक्ष सहभागी होणार नसल्याचे सांगितले होते.

मात्र, कसबा पोटनिवडणुकीच्या निमित्ताने भाजप आणि महाविकास आघाडीत अटीतटीची लढाई सुरु असल्याने गिरीश बापट आजारपण बाजूला सारून आपल्या पक्षासाठी प्रचाराच्या मैदानात उतरणार आहेत. ते गुरुवारी संध्याकाळी पाच वाजता नारायण पेठेतील केसरीवाडा येथे कार्यकर्ता मेळाव्यात सहभागी होणार आहेत. त्यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांचा उत्साह कमालीचा दुणावला आहे.

# सुरगाणा येथे एकाच कुटुंबातील तीन कर्त्या पुरुषांचा दुर्दैवी अंत



✔ **सुराज्य/सुरगाणा** : वणी-पिंपळगाव रस्त्यावरील बोराळे फाट्याजवळ मंगळवारी अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत तिसगाव (ता. दिंडोरी) येथील एकाच कुटुंबातील काका व दोन पुतणे असे तीन जण जागीच ठार झाले. घरातील तीन कर्ते पुरुष ठार झाल्याने कराटे कुटुंबासह तिसगावावर शोककळा पसरली आहे.

मंगळवारी (दि. १४) सायं. ६.३०च्या सुमारास हा अपघात झाला. बोराळे फाटा येथे वणीकडून पिंपळगाव बसवंतकडे भरधाव जाणाऱ्या वाहनाने तीसगावहून वणीकडे येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यात दुचाकीवरील निवृत्ती सखाराम कराटे (वय ५५, काका), केदू यशवंत कराटे (वय ३५, पुतण्या), संतोष विष्णू कराटे (वय ३३, पुतण्या, सर्व रा. तिसगाव, ता. दिंडोरी) हे जागीच ठार झाले. शेतमजुरीचे काम करणारे हे तिघे काका-पुतणे वणी येथे आठवडे बाजारासाठी येत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. अपघाताचे वृत्त कळताच पोलिसांनी वणी ग्रामीण रुग्णालयात मृतदेह शव विच्छेदनासाठी आणले. रात्री उशिरा ग्रामीण रुग्णालयात विच्छेदन करून मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आले. पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे.

# टाटांची मेगा डील; ८४० विमानांची जम्बो खरेदी

### होणार ८५ अब्ज डॉलरचा व्यवहार

✔ सुराज्य/नवी दिल्ली

टाटा समूहाची कंपनी एअर इंडियाने मोठ्या प्रमाणात विमाने खरेदी करण्याची ऑर्डर दिली असून ज्याची देशात आणि जगात मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. ही ऑर्डर प्रत्यक्षात ४७० नसून ८४० विमानांची आहे.

कंपनीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने गुरुवारी हा खुलासा केला. त्यांनी सांगितले की कंपनीने जगातील आघाडीच्या विमान उत्पादक एअरबस आणि बोईंगला जी मोठी ऑर्डर दिली आहे. त्यात आणखी ३७० विमाने खरेदी करण्याचा पर्याय समाविष्ट आहे. यापूर्वी ही माहिती समोर आली होती की, एअर इंडियाने एअरबसकडे २५० आणि बोईंगला २२० विमानांची ऑर्डर दिली आहे.



एअर इंडियाच्या विमान खरेदीच्या ऑर्डरची ताजी माहिती टाटा समूहाच्या एअरलाइन्सचे मुख्य अधिकारी निपुण अग्रवाल यांनी गुरुवारी सोशल मीडिया पोस्टद्वारे दिली आहे. अग्रवाल म्हणाले की, एअर इंडियाची विमाने खरेदी करण्याची ऑर्डर ही भारतीय विमान वाहतूक उद्योगासाठी मैलाचा दगड आहे आणि जगभरात ज्या प्रकारचा उत्साह दिसून येत आहे त्यामुळे आम्ही खूप आनंदी आहोत. त्यांच्या लिंक्डइन पोस्टमध्ये ऑर्डरचा तपशील देताना त्यांनी लिहिले, ४७० विमाने खरेदी करण्याच्या फर्म ऑर्डरव्यतिरिक्त, त्यात पुढील दशकात एअरबस आणि बोईंगकडून आणखी ३७० विमाने खरेदी करण्याचे पर्यायी अधिकार देखील समाविष्ट आहेत.

एअर इंडियाची ही ऑर्डर एव्हिएशन उद्योगाच्या आधुनिक इतिहासातील कोणत्याही एका विमान कंपनीने दिलेल्या सर्वात मोठ्या ऑर्डरपैकी एक मानली जाते. मंगळवारी स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही एअर इंडियाच्या विमान खरेदीच्या ऑर्डरचे कौतुक केले आणि याला ऐतिहासिक करार म्हटले. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडन यांनीही अमेरिकन कंपनी बोईंगला दिलेल्या ऑर्डरचे स्वागत केले असून ते दोन्ही देशांसाठी फायदेशीर असल्याचे म्हटले आहे.

# सेंद्रिय शेती अभ्यासासाठी सत्तार विदेश दौऱ्यावर



✔ सुराज्य/मुंबई

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी जागतिक आर्थिक परिषदेसाठी केलेला दाव्होस दौरा चांगलाच गाजला होता.**

दावोसला जाऊन आपण महाराष्ट्रासाठी मोठ्या प्रमाणावर परकीय गुंतवणूक घेऊन आल्याचा दावाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून करण्यात आला होता. यानंतर आता कायमच चर्चेत असणारे राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार हे परदेश दौऱ्यावर जाणार आहेत. अब्दुल सत्तार हे कृषी खात्याच्या काही अधिकाऱ्यांसह जर्मनी आणि स्वित्झर्लंडला जाणार आहेत.

जर्मनीच्या न्यूरेमबर्ग येथे १५ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी या काळात सेंद्रिय खाद्यपदार्थांचा व्यापारी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. जर्मनीतील सेंद्रीय कृषी संस्थेच्या परिसरात हा मेळावा भरला आहे. या व्यापारी मेळाव्यासाठी अब्दुल सत्तार हे जर्मनीला जाणार आहेत. याठिकाणी जाऊन अब्दुल सत्तार यांच्याकडून सेंद्रिय शेतीसंदर्भात राज्यात परकीय गुंतवणूक कशी आणता येईल, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

# पानसरेंचा जीव घेणारे आरोपी ८ वर्षांनंतरही मोकाट

✔ सुराज्य/कोल्हापूर

ज्येष्ठ पुरोगामी नेते कॉम्रेड गोविंद पानसरे यांची हत्या होऊन आठ वर्षे पूर्ण झाली. मात्र, अजूनही या गुन्ह्याचा तपास पूर्ण झालेला नाही. मारेकरी आजही मोकाट आहेत. तसेच तपास यंत्रणेला तपासात येणाऱ्या अडथळ्यांमुळे होणारी दिरंगाई या सर्वांवर नाराजी व्यक्त करत पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांनी आज मॉर्निंग वॉकचे आयोजन केले.

जोपर्यंत हत्येचा तपास लागत नाही, तोपर्यंत लढा देत रस्त्यावर उतरत राहू, असा इशारा कॉम्रेड यांनी दिला आहे. दरम्यान यावेळी त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. तसेच एन. डी. पाटील आणि पानसरे यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला.

मॉर्निंग वॉकदरम्यान 'गोविंद पानसरे अमर रहें', 'हम सब पानसरे', 'पानसरे जी को लाल सलाम' अशा घोषणा देत तपास यंत्रणांविरोधात रोष व्यक्त करण्यात आला.

कॉम्रेड गोविंद पानसरे आणि त्यांच्या पत्नी उमा पानसरे मॉर्निंग वॉकला गेल्यानंतर घरासमोरच त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. यामध्ये पानसरे यांचा मृत्यू झाला, तर उमा पानसरे गंभीर जखमी झाल्या होत्या.

सोमवारी या घटनेला आठ वर्षे पूर्ण झाली. मात्र, अद्याप मारेकऱ्यांचा सुगावा तपास यंत्रणेला लागलेला नाही. तसेच सध्या हा खटला न्यायालयात आहे. पानसरे तपासातील एसआयटीच्या धीम्या गतीमुळे हायकोर्टाने कुटुंबियांच्या विनंतीनुसार काही महिन्यांपूर्वी हा तपास एटीएसकडे वर्ग केला गेला आहे. सध्या संशयित आरोपीवर दोषनिश्चिती करण्यात आली असून पुरावे, कागदपत्र गोळा करण्याचे काम सुरू आहे.

# सोयाबीनचे दर स्थिरावले, तुरीला अच्छे दिन

### दरात मोठी वाढ; शेतकऱ्यांच्या धोरणाला यश

✔ सुराज्य/वाशिम

**मराठवाडा आणि विदर्भातील शेतकरी तुरीची मोठ्या प्रमाणात लागवड करत असतात. आंतरपीक म्हणून देखील तूर लावली जाते. यंदा तुरीला समाधानकारक दर मिळत असल्यानं शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.**

सोयाबीन आणि कापसाला अपेक्षेप्रमाणं दर मिळत नसला तरी तुरीच्या चागंल्या दरामुळं शेतकऱ्यांना आधार मिळत आहे. तुरीनं ८३०० चा टप्पा पार केला. मागील दोन दिवसात तुरीच्या दरात घसरण होत असल्याचे तिचे चित्र होते. मात्र, पुन्हा तुरीच्या दरात मोठी वाढ झाली आहे. परिणामी आवकही वाढली असून शेतकऱ्यांना चांगलाच फायदा होताना दिसून आलं.

राज्यातील काही बाजार समित्यांमध्ये आज तुरीने साडेआठ हजारांचा टप्पा गाठलाय तर वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तुरीला किमान ७७५० ते कमाल ८२०० रुपये इतका दर मिळाला आहे वाशिममध्ये १९२० क्विंटल तुरीची आवक झाली. तर वाशिम जिल्ह्यातील कारंजा बाजारपेठेमध्ये तुरीला कमाल ८२५५ इतका दर मिळाला आहे.



वाशिमच्याच अनसिंग उपबाजार समितीतही तुरीला चांगले दर मिळाले असून तिथे किमान ७५५०ते ८३०० इतका उच्चतम दर मिळाला आहे.

यंदा तुरीचे उत्पादन घटले असले तरी चांगले दर मिळत असल्याने उत्पन्नातील तफावत भरून निघत आहे त्यामुळे शेतकरी समाधानी असून सध्या बाजारात तुरीची आवक वाढली आहे.

### सोयाबीनचे दर स्थिर

एकीकडे तुरीच्या दरात सातत्याने वाढ होत असताना सोयाबीनच्या दराने मात्र शेतकऱ्यांची निराशा केली आहे. मागील आठवड्यात ५४०० पर्यंत गेलेल्या सोयाबीनच्या दरात या आठवड्यात सातत्याने घट झाली आहे. वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनला किमान ४८५० ते कमाल ५२५० इतका दर मिळाला तर कारंजा कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनचे दर किमान ५०२५ ते कमाल ५३१० इतके होते वाशिमच्या अनसिंग उपबाजार समितीत सोयाबीनला ५०५० ते ५२५० इतका दर मिळाला आहे. सोयाबीनच्या दरात घट झाल्यानंतर आवकही मंदावलेली असून शेतकरी अजूनही मोठ्या दरवाढीच्या प्रतिक्षेत आहेत. शेतकऱ्यांनी एकूण उत्पादनाच्या ६० ते ७० टक्के सोयाबीन घरीच ठेवलं आहे.

# भर उन्हात दिव्यांगाचे सायकलसाठी कलेक्टर कार्यालयात हेलपाटे

✔ सुराज्य/सोलापूर

**भर उन्हात दोन्ही पायाने दिव्यांग असलेल्या महंमद फारूख माणिकपेठे (रा.मैंदर्गी, तालुका अक्कलकोट) हा गुरूवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आला. ओ कलेक्टर साहेब माझी तीन चाकी सायकल तुटली आहे, मदत करा म्हणून त्याने आर्त हाक दिली पण उपयोग झाला नाही. अक्कालकोट आणि जिल्हाप्रशासनात त्यांची अनेक दिवसापासून हेळसांड चालू आहे.**

## मदत काही मिळेना प्रशासन काही हालेना




महंमद माणिकपेठे हा जन्मता दोन्ही पायाने दिव्यांग आहे. गुरूवारी दुपारी दीड वाजता भर उन्हात हातावर रांगत तो जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारातून आला. पोर्चमध्ये आल्यावर त्याने माझी सायकल तुटली आहे, कलेक्टर साहेब आहेत काय अशी विचारणा केली. तेथील लोकांनी कलेक्टर नाहीत असे सांगितल्यावर तो निराश झाला व तेथेच बसून राहिला. पोर्चमध्ये त्यावेळी असलेल्या तीन तरुणांना त्याची दया आली. त्यांनी आस्थेने कलेक्टरांकडे काय काम आहे असे विचारले. त्यावेळी त्यांने तीन चाकी सायकल तुटली आहे. दुरूस्तीसाठी पैसे नाहीत. मैंदर्गी नगरपालिकेत जाउन मदत मागितली पण कोणालाही दया आली नाही. त्यामुळे कलेक्टरांना भेटण्यासाठी आलो आहे. यापूर्वी कलेक्टरांनी मला मदत केली असल्याचेही तो म्हणाला. त्यामुळे तेथील तरुणांनी निवासी वैद्यकीय अधिक़ारी शमा पवार यांना भेटण्याचा प्रयत्न केला. पण त्या बैठकीत व्यस्त होत्या. त्यांच्या शिपायाने पवार यांची भेट घालून देण्याचे आश्वासन दिले. तितक्यात कलेक्टर शंभरकर यांचे सेवक माळी तेथे आले व त्यांनी महंमद याला ओळखले व चौकशी केली. यापूर्वीही जिल्हाधिकाऱ्यांकडे आला होता. त्याला संजयगांधी निराधर योजना, घरकुल योजनेचा लाभ दिल्याचे त्यांनी सांगितले. सायकल दुरूस्तीसाठी मदत करून असे म्हणून माळी यांनी सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी बोलणी केली. पण उपयोग झाला नाही.

### महंमदला मदत करणार का?

जिल्हा प्रशासनाने गेल्याच महिन्यात दिव्यागांसाठी मनपा ग्रामपंचायत, नगरपालिकांना तीन टक्के निधी खर्च करण्याच्या सूचना दिल्या होत्या. पण यातून खऱ्या गरजूंना मदत मिळत नसल्याचे दिसून येत आहे. अडचणीत असलेल्यांना मदत केल्याच्या अनेक दातृत्वाच्या घटना आपण पाहतोच. महंमदच्या सायकल दुरूस्तीसाठी कोण पुढे येणार? असा आता प्रश्न आहे.

## कुडलसंगम येथे महाशिवरात्रीनिमित्त संगम आरतीचे आयोजन

✔ **दक्षिण सोलापूर** : संगमेश्वर देवस्थान परिसर सुधारणा समिती व संगमेश्वर भक्त मंडळ यांच्यावतीने हत्तरसंग कुडल संगम (दक्षिण सोलापूर) येथे महाशिवरात्रीनिमित्त शनिवार दि. १८ फेब्रुवारी रोजी संगम आरती आयोजित करण्यात आली आहे. काशीच्या धर्तीवर ही संगम आरती होत असून, भीमा व सीना या दोन्ही नद्यांच्या संगमावरील संगम घाटावर सायंकाळी पाच वाजता ही आरती होणार आहे. यंदा संगम आरतीचे चौथे वर्ष आहे. नद्यांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या आरतीचे आयोजन करण्यात येते. तसेच दीपोत्सव होणार आहे. विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी पहाटे ६ वाजता संगमनाथ लिंगास महाभिषेक करण्यात येणार आहे.



त्यानंतर सकाळी ८ वाजल्यापासून जगातील एकमेव बहुमुखी शिवलिंगास निरंतर अभिषेक करण्यात येणार आहे. दिवसभर भक्तांना निरंतर फराळाची व्यवस्था करण्यात आली आहे. शनिवारी रात्रभर भजन होणार आहे. शनिवारी सायंकाळपासून रविवारी पहाटेपर्यंत संगमनाथ व परिसरातील सर्व देवतांची ५ वेळा पूजा व आरती होणार आहे. भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन संगमेश्वर देवस्थान परिसर सुधारणा समिती व संगमेश्वर भक्त मंडळ यांनी केले आहे.

## कारच्या धडकेत एकाचा मृत्यू

✔ **सोलापूर** : भरधाव वेगात येणाऱ्या कारने पायी चालत जाणाऱ्या एकास धडक देऊन त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी कारचालकाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.१५ फेब्रुवारी रोजी रात्री पुणे ते तुळजापूर जाणाऱ्या सर्विस रोडवर घडली. याप्रकरणी तपन नारद सरकार (वय-६०,रा.मसरे टाउनशिप उपाध्ये साईड डी मार्ट समोर,सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून चार चाकी कार क्र.एम.एच.२५.आर.८०१५ यातील चालक यश अरुण शिंदे (वय-२६,रा.समता कॉलनी शकुंतला बिल्डिंग,उस्मानाबाद) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. सरकार व त्यांचा मित्र अजय आत्माराम सुद (वय-५५,रा.मसरे टाऊनशिप सोलापूर) हे डी मार्ट मधून किराणामाल घेऊन येत होते. त्यावेळी वरील ठिकाण्याहून भरधाव वेगात येणाऱ्या कारचालकाने अजय सुद यांना पाठीमागून धडक दिली. यात त्यांचा मृत्यू झाला. पुढील तपास स.पो.नि. जाधव करीत आहेत.

## एमआयडीसीत अग्निशामक दल केंद्रासाठी प्रस्तावाचे आदेश : आयुक्त

✔ **सोलापूर** : आगींच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर अक्कलकोट रोड एमआयडीसीत अग्निशामक दल केंद्रासाठी लेआउट प्रस्ताव तयार करण्यासंदर्भात आदेश प्रशासनाला दिल्याची माहिती महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिली.



अक्कलकोट रोड एमआयडीसी मध्ये रबर फॅक्टरी ला आग लागल्याची घटना घडली. अशा प्रकारच्या अधूनमधून घटना घडत आहेत. या ठिकाणी अग्निशामक दल केंद्राची आवश्यकता आहे. तशी मागणीही होत आहे. त्यासाठी प्रशासनाला आदेशही दिले आहेत. अक्कलकोट रोड एमआयडीसी मध्ये महापालिकेच्या अखत्यारित जागा आहेत. मात्र अग्निशामक दलासाठी पाण्याची आवश्यकता असते. त्यासाठी तेथे असलेल्या पाण्याच्या टाकी जवळील जागा लागणार आहे मात्र ही जागा एमआयडीसी प्रशासनांतर्गत येते. त्यासाठी एमआयडीसीचे आर.ओ.यांच्याकडून ना हरकत पत्र घेण्यात येणार आहे. त्यानंतर अग्निशामक दल केंद्रासाठीचा लेआउट करून प्रस्ताव तयार करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. निधीसाठी डीपीसीकडे मागणी करण्यात येणार असल्याचेही महापालिका आयुक्त तेली-उगले यांनी स्पष्ट केले आहे.

## एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दोन दुचाकी पळवल्या

✔ **सोलापूर** : एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दोन दुचाकी चोरून नेल्याच्या घटना घडल्या आहेत. पहिली घटना ही जुना विडी घरकुल सोलापूर येथे दि. ७ ते ८ फेब्रुवारी दरम्यान राहत्या घरासमोर घडली. नंदकिशोर सिद्राम आडम (वय-४२,रा.जुना विडी घरकुल, सोलापूर) याची एम.एच.१३.बी.वाय.९२४७ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. तपास पो.कॉ. भांगे हे करीत आहे तसेच दुसरी घटना ही जुना विडी घरकुल या परिसरातीलच पिठ्ठा नगर येथे दि.१२ ते १३ फेब्रुवारी दरम्यान घडली. अमर नारायण बुरा (वय-३६) यांची एम.एच.१३.डी.बी.८८२३ ही चोरट्याने चोरून नेली आहे. तपास पो.कॉ. गायकवाड करीत आहेत.

## शिवजयंतीनिमित्त भगवा आखाडा युवा प्रतिष्ठानतर्फे रविवारी मिरवणूक

### अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड यांची उपस्थिती

✔ **सोलापूर** : उत्तर कसबा येथील भगवा आखाडा युवा प्रतिष्ठानच्या वतीने शिवजयंती निमित्त रविवारी भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत स्वराज्य रक्षक संभाजी या मालिकेतील सिने अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड या येसूबाई यांच्या वेशभूषेत सहभागी होणार आहेत, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष सुरज बंडगर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भगवा आखाडा युवा प्रतिष्ठानच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत सिने अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड या येसूबाई यांच्या वेशभूषेत सहभागी होणार आहेत. यामध्ये महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग राहणार आहे. मिरवणूक मार्गावरील बंदोबस्तात असलेल्या सर्व पोलिसांना फूड पॅकेट वाटप करण्यात येणार आहे. शनिवार दिनांक १८ फेब्रुवारी रोजी रंगराज नगर येथील रंगराज गोशाळेत गाईंना ५ टन चारा वाटप करण्यात येणार आहे, असे संस्थापक अध्यक्ष सुरज बंडगर यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस उत्सव अध्यक्ष प्रसाद पवार, राज सलगर, सुरज बावधनकर, समर्थ कदम आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.



## शिवजयंती पाळणा कार्यक्रमाला येणाऱ्या महिलांसाठी मोफत बससेवा

### महापालिकेचा उपक्रम

✔ **सोलापूर** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त पाळणा कार्यक्रम आयोजित केला आहे. यासाठी महिलांकरिता महापालिकेकडून मोफत बस सेवा उपलब्ध करण्यात आली असल्याची माहिती आयुक्त शितल तेली - उगले यांनी दिली.

शिवजयंती निमित्त दिनांक १८ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पाळणा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी हजारोच्या संख्येने महिला उपस्थित राहणार आहेत. या महिलांसाठी महापालिका परिवहन उपक्रमाकडील बस सेवा मोफत उपलब्ध करण्यात येणार असल्याचे आयुक्त शितल तेली - उगले यांनी स्पष्ट केले. मध्यरात्री हा कार्यक्रम असल्याने घरी परतण्यासाठी वाहनांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे.



यामुळे ही मोफत बस सेवा उपलब्ध करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान यासाठी शहरातील नेमक्या कोणत्या ठिकाणाहून बस सोडायच्या या संदर्भात ही माहिती मागविण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. मोफत बस सेवेचा हा खर्च महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या निधीतून तरतूद करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## पीएमकिसान योजनेच्या लाभासाठी आधार संलग्न बँकखाते अनिवार्य




✔ **सोलापूर** : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएमकिसान) योजनेच्या १३ व्या हप्त्याच्या लाभासाठी आधार संलग्न बँकखाते अनिवार्य केलेले आहे. लाभार्थींना त्यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडण्याची सुविधा त्यांच्या गावातील पोस्ट ऑफिसमार्फत उपलब्ध करण्यात आली आहे. प्रलंबित लाभार्थींनी त्यांचे बँक खाते उघडावे, असे आवाहन असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी केले आहे.

पीएम किसान योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबास २ हजार प्रती हप्ता याप्रमाणे ६ हजार प्रती वर्षी लाभ देण्यात येतो. केंद्र शासनाने १३ व्या हप्त्याचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थींनी त्यांचे लाभ जमा करावयाचे बँक खाते आधार क्रमांकास जोडणे बंधनकारक केले आहे. राज्यात सद्यस्थितीत १४.३२ लाख लाभार्थीची बँक खाती त्यांच्या आधारक्रमांकास जोडलेली नाहीत. त्यामुळे या लाभार्थीच्या खात्यात १३ व्या हप्त्याचा लाभ जमा होणार नाही. या योजनेतील प्रलंबित लाभार्थींची बँक खाती आयपीपीबीमध्ये उघडून ती आधार क्रमांकास जोडण्यासाठी राज्याच्या आयपीपीबी कार्यालयास गावनिहाय याद्या उपलब्ध करून दिल्या आहेत. लाभार्थींना त्यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडण्यासाठी आपले आधार कार्ड, मोबाईल क्रमांक या कागदपत्रांच्या आधारे इंडिया पोस्ट पेमेंट बँकेत (आयपीपीबी) आपल्या गावातील पोस्ट विभागाचे कर्मचारी यांच्यामार्फत खाते उघडावे. हे बँक खाते आपल्या आधार क्रमांकाशी जोडले जाईल. ही पद्धत अत्यंत सोपी व सुलभ आहे. आयपीपीबी मध्ये बँक खाते सुरू करण्याची सुविधा पोस्ट कार्यालयातच उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले.

## शिवजयंतीनिमित्त मोफत पात्रता प्रमाणपत्र मेळावा

✔ **सोलापूर** : नव्याने उद्योग सुरु करणाऱ्याांना व व्यवसाय सुरु असणाऱ्या मराठा समाजातील तरुणांना आर्थिक सहाय्य पुरविण्याच्या दुष्टीने अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत विविध योजना राबवण्यात येतात. या योजनाचा लाभ घेण्यासाठी शिवजयंतीच्या निमित्ताने १७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता मोफत पात्रता प्रमाणपत्र मेळावा आयोजित केला आहे. जुना पुना नाका येथीलल वैभवशाली चेंबर येथे हा मेळावा होणार आहे.

मेळाव्याचा शुभारंभ शिवसेना जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ज्ञानेश्वर सपाटे, मनीष केत, सुधीर गावडे, गणेश देशमुख, योगेश जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. त मराठा व्यवसायीक बांधवांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन नितीन मोरे यांनी अवाहन केले आहे.

## सावंत बंधूंच्या महाआरोग्य शिबिराची घेतली इंटरनॅशनल वर्ल्ड रेकॉर्डने दखल

✔ सुराज्य/माढा

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत व बाळासाहेबांची शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी आयोजित केलेल्या महाआरोग्य शिबिराची दखल इन्टरनॅशनल वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स या संस्थेने घेतली आहे. २६ मार्च २०२३ ला मुंबईत प्रा.सावंत बंधूंना याबाबतचे सन्मान पत्र व सम्मानचिन्ह मान्यवरांच्या हस्ते वितरीत केले जाणार आहे.

प्रा.सावंत बंधूंनी जगातील सर्वात मोठे आरोग्य शिबीर घेतल्याचे रेकॉर्ड केले आहे. प्रा.सावंत बंधूबरोबर डॉ. दिलीप पवार व त्यांच्या सहकाऱ्यांचेही कौतुक



होणार आहे. २८ नोव्हेंबर २०२२ रोजी उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम,परंडा येथे आयोजित केलेल्या महाआरोग्य शिबीरात तीन लाख सात हजार रूग्णांची मोफत तपासणी करण्यात आली.यासाठी १ हजार ८०० डॉक्टरांनी रुग्णसेवेचे काम करुन औषध उपचार देण्यात आले. आरोग्यमंत्री डॉ.तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतुन परांडा शहरात गफार शहा कोटला मैदानात आयोजित केलेल्या शिबिरात भूम, परांडा मतदार संघातील लाखो गोरगरिब रुग्णांनी विविध आरोग्य सुविधांचा लाभ घेतला होता.शिबीरात देशासह विदेशातील नामांकित डॉक्टरांनी सहभाग नोंदवुन रुग्णांच्या तपासण्या केल्या होत्या.

मातांची वजन आणी उंची घेऊन बीएमआय काढणे, एचबी पर्सटेज काढणे, रक्तदाब, मधुमेह यासह अन्य तपासण्या काढण्यात आल्या. स्त्री रोगतज्ञ, कान-नाक- घसा -पोट तज्ज्ञ, नेत्ररोग, दंतरोग तज्ञ यांच्या मार्फत तपासण्या करण्यात आल्या या सर्व बाबींची दखल घेऊन प्रा. सावंत बंधुच्या महाआरोग्य शिबिराचे इन्टरनॅशनल वर्ल्डरेकार्ड झाले आहे.

## नुकसान भरपाईचा अहवाल अद्याप जलसंपदा विभागाकडे पोहचला नाही

✔ **चिखली** : मोहोळ तालुक्यातील पाटकूल शिवारातून जाणारा उजनीचा डावा कालवा फुटून जवळपास सतरा दिवस झाले उलटून गेले .अद्यापही नुकसान भरपाईसाठी आवश्यक असणारा कृषी व महसूल विभागाचा अहवाल जलसंपदा विभागाकडे पोहोचलाच नाही. अहवाल नेमका गेला कुठे याची विचारणा पाटकूल येथील नुकसानग्रस्त शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.

पाटकूल शिवारातून जाणारा डावा कालवा २९ जानेवारी रोजी खरात वस्ती जवळ फुटून परिसरातील शेतीचे नुकसान झाले होते. नुकसानीचा अहवाल कृषी विभागाने आणि तहसील प्रशासनाने लाभक्षेत्र विभागाकडे तातडीने पाठविला असला तरी लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाकडे मात्र अहवाल आला नसल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत आता संभ्रमाचे वातावरण तयार झाले आहे. डावा कालवा फुटल्याने यात शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या, गहू, हरभरा यासह अन्य पिके पाण्यात गेली, विहिरींत गाळ जाऊन विहिरी काठोकाठ भरल्या या सर्व नुकसानीची पाहणी जिल्हाधिकारी यांनी समक्ष येऊन केली होती. महसूल प्रशासनाने तातडीने पथके नेमून युद्ध पातळीवर पंचनामे करून नुकसानीचा अहवाल कृषी विभागाला पाठवून दिला होता. कृषी विभागाने महसूल विभागाचा आणि त्यांचा मिळून अहवाल वरिष्ठांकडे सादर केला. मात्र तो अहवाल १७ दिवस झाले तरी जलसंपदा विभागाकडे पोहोचला नसल्याने अहवाल गेला तरी कुठं? यात नेमकं कोण वेळ काढूपणा करतय याची वरिष्ठ पातळीवर चौकशी करावी, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.






**संत सेवालाल जयंती साजरी**

शहरात गुरूवारी संत सेवालाल जयंती साजरी करण्यात आली. यावेळी काढण्यात आलेल्या मिरवणुकीत बंजारा समाजाच्या महिलांनी नृत्य सादर करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

## फेज एकमधील उड्डाणपुलाच्या भूसंपादनाचे ६० टक्के काम पूर्ण

✔ सुराज्य/सोलापूर

**शहरातील उड्डाणपूल भूसंपादनाचे काम वेगाने सुरू असून जुना पुणे नाका ते पत्रकार भवन या फेज एकमधील उड्डाणपुलाच्या भूसंपादनाचे ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. एकूण खासगी १०२ मिळकतींपैकी ७३ मिळकतींच्या निवाड्याला जिल्हाधिकाऱ्यांकडून मान्यता मिळाली आहे. त्यासाठी लागणारे पैसे भरले आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त शितल-तेली उगले यांनी केली.**



फेज वनचे भूसंपादन पूर्ण करण्यासाठी आता महापालिकेने एप्रिल महिन्याची डेडलाईन संबंधित विभागाला दिली आहे. जुना पुणे नाका ते पत्रकार भवनपर्यंत या मार्गावरील उड्डाणपुलासाठीची भूसंपादन प्रक्रिया वेगात सुरू आहे. आतापर्यंत ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. साडेपाच कि.मी. मार्गाच्या भूसंपादनासाठी रेडीरेकनर दरानुसार एकूण ६ टप्पे पाडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निवाडा मंजूर करून घेण्यात येत आहे. या मार्गातील शासकिय जागांचा विषय महापालिकेकडे असून भूसंपादन विभागाकडे केवळ खासगी जागांसाठीची प्रक्रिया केली जात आहे. या मार्गावर एकूण १०२ खासगी मिळकती असून त्यातील ७३ मिळकतींची निवाडा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. उर्वरित ३२ मिळकतींच्या निवड्यासाठीचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या महिन्याअखेरपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होणार आहे. फेज वनमधील उड्डाणपुलाचा निवाडा जाहीर करून मिळकतदारांना मोबदला देण्यासाठी एप्रिल महिन्याअखेरपर्यंत भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून द्यावी, अशा सूचना आयुक्त शीतल तेली-उगले यांनी भूसंपादन विभागाला दिल्या आहेत. मुदतीत काम पूर्ण होण्यासाठी महापालिकेने आपल्या हिस्स्यापोटीची रक्कम वेळेत भरणा करून घ्यावी, असेही भूसंपादन विभागाकडून सांगण्यात आले.

### एप्रिल महिन्यापर्यंत प्रक्रिया पुर्ण होईल: जोशी

काही तांत्रिक अडचणीच्या मिळकती वगळता इतर मिळकतींची निवाडा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. अनेक मिळकतदारांनी ताबा दिला आहे. काही मिळकतदार ताबा घेण्यासाठी जागा रिकामी करीत आहेत. एप्रिल महिन्यापर्यंत प्रक्रिया पूर्ण होईल आणि दुसऱ्या उड्डाणपुलाला मार्च महिन्यात सुरूवात करण्यात येईल, असे भूसंपादन अधिकारी केशव जोशी यांनी सांगितले.